नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १४८ * | * अकोला * | सोमवार, दिनांक १ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कफ सिरप तस्करीच्या सूत्रधाराला अटक

■ वृत्तसंस्था, सोनभद्र, दि. ३० :

उत्तर प्रदेशातील सोनभद्र येथील बेकायदेशीर कफ सिरप व्यापारी भोला जयस्वाल याला पोलिसांनी कोलकाता येथून अटक केली आहे. ड्रग्ज माफिया शुभम जयस्वाल याचे वडील भोला याला अटक करण्यात आली तेव्हा तो परदेशात पळून जाण्याच्या तयारीत होता. सोनभद्रचे पोलिस अधीक्षक अभिषेक वर्मा हे ड्रग्ज माफिया आणि कफ सिरप तस्करीविरुद्ध विशेष मोहीम राबवत आहेत. या संदर्भात, अतिरिक्त पोलिस अधीक्षक, मुख्यालय आणि शहर मंडळ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कफ सिरप तस्करीचा सूत्रधार भोला प्रसाद जयस्वाल याला कोलकाता येथून अटक केली आहे.

### अग्राग्रलेख

## खरीखरी..

## अफगाणी मैत्री टिकून राहो!

आपल्या देशाला एक नवा मित्र मिळालेला आहे. महाभारत कालीन गांधार म्हणजेच कंदाहार आहे. आता त्या भूभागाला अफगाणिस्तान म्हटले जाते. आताच्या कंदाहार आणि तेव्हाच्या गांधार नरेशांसह त्यांची पत्नी, पुत्र शकुनी आणि त्यांची एक पुत्री हे सर्वजण कौरवांच्या कैदेत होते. कारागृहामध्ये या सर्वांना केवळ मूठभर भात देण्यात येत होता, यामुळे हे चौघेही तडफडून तडफडून मरण पावले असते. पण त्या चौघांनी एक निर्णय घेतला की हे सर्व अन्न एकट्या शकुनीला खायला द्यायचे. किमान त्यामुळे तो तरी जिवंत राहील. या सगळ्या गोष्टींची पौराणिक पार्श्वभूमी आम्ही याच स्तंभात विषद केलेली होती. आताच्या अफगाणिस्तानचा म्हणजेच पूर्वीच्या गांधारचा परिवार महाभारत काळामध्ये कौरवांच्या कैदेत का होता यामागे फार मोठे कारण आहे. धृतराष्ट्राबरोबर लग्न केलेली गांधारी हे पूर्वाश्रमीची विधवा होती, अशी वदंता कानी आल्यावर पितामह भीष्मांना गांधारच्या लोकांनी केलेली फसवणूक लक्षात आली आणि त्यांनी या परिवाराला कैदेत टाकले होते. त्यामध्ये फक्त शकुनी वाचला आणि त्यानंतर शकुनीने कौरवांचा त्यांच्या बाजूला राहूनच कसा बदला घेतला आणि संपूर्ण कौरव कुळाचा कसा संहार केला हे सर्वश्रुत आहे. त्याकाळी द्यूत या खेळाचा चौसर म्हणजेच सारीपाट मांडला जायचा. या चौसरचे फासे शकुनीला वश होते. त्यासाठी तंत्र, मंत्र या गोष्टीचा उपयोग केला जायचा. म्हणजेच आपल्या म्हणण्याप्रमाणे फासे पडण्यासाठी शकुनीने एक विशिष्ट यंत्रणा राबवली होती आणि मग आपल्या बहिणीच्या म्हणजेच गांधारीच्या अपमानाचा बदला घेतला, असा हा पौराणिक दाखला आहे. असा हा अफगाणिस्तान देश आहे आणि सध्या तेथील राज्यकर्ते तालिबानी आहेत. काही वर्षांपूर्वी पाकिस्तानने भारताचे विमान अपरण करून कंदाहारला नेले होते त्यानंतर भारताला काही पाकिस्तानी दहशतवाद्यांना सोडावे लागले. त्याच काळात जगातील सर्वात मोठ्या बुद्धमूर्ती असलेल्या अफगाणिस्तान मधील मोठमोठ्या बुद्धमूर्ती फोडून पाडण्यात आल्या होत्या. अशा अफगाणिस्तानला सध्या तरी भारताशिवाय दुसरा कोणी वाली नाही. सध्या पाक बरोबर त्यांचे हाडवैर आहे, त्यातच भारताने अफगाणिस्तानात बरीच मोठ-मोठी कामे केलेली आहेत त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही अशा स्थितीत दोघांनी १०० दशलक्ष डॉलरचा करार केलेला आहे. हा करार अफगाणिस्तानात निर्यात करण्यात येणाऱ्या औषधांबाबत आहे. सुरुवातीला एक झायडस नावाची कंपनी अफगाणिस्तान मध्ये औषधांची निर्यात करणार आहे आणि त्यानंतर त्यांचे एक वेगळे कार्यालय अफगाणिस्तान मध्ये स्थापन होणार आहे आणि तिथेच औषधांचे उत्पादन होणार आहे. विशेष म्हणजे याबाबतची प्रक्रिया अधिक सुरू झालेली आहे. यामुळे अफगाणिस्तान मधील तालिबान्यांना बरीच मदत मिळणार आहे. आज अफगाणिस्तानला भारताच्या मदतीची गरज आहे. भारताने बांधलेले एक महत्त्वाचे बंदर त्यांच्या चांगलेच फायद्याचे ठरलेले आहे. त्या जागेवर पाकिस्तान आणि चीनची नजर होती. पण आता तसे होणे शक्य नाही. परवा श्रीलंकेवरील संकटावेळी भारतानेच मदतीचा हात दिला होता. सध्या बांगलादेश असो, नेपाळ असो किंवा पाकिस्तान असो हे तिघेही भारतासोबत उभा दावा मांडून आहेत. चीनला भारताच्या शेजारच्या देशांकडून भारताला त्रास देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करायचा आहे. पण भारताच्या उदारतेमुळे हळूहळू काही देश निश्चितच भारताशी मैत्री राखतील अशी अपेक्षा आहे. बांगलादेश मधील क्रांतीनंतर अपघाताने सत्ताधीश झालेल्या मोहम्मद युनूसलाही लवकरच सत्तेच्या बाहेर पडावे लागेल असे दिसते. त्यानंतर जे सरकार येईल ते भारताचे शत्रू असणार नाही अशी अपेक्षा आपण केली पाहिजे. अफगाणिस्तान बरोबर केलेल्या करारामुळे आज आपल्याला आनंद होत असला तरी आजच्या तारखेला अडकलेला अफगाणिस्तान मुक्त झाल्यावर त्याची भारतासोबत मैत्री कायम राहील याचे शाश्वती कोण देणार, हा मोठा प्रश्न आहे. आपल्या अंतर्गत व्यवहारात देशातील नक्षलवाद आपण जवळजवळ संपवलेला आहे. पण आपल्या शेजारील राष्ट्रांच्या आणि विशेषता पाकिस्तान्यांच्या दहशतवादी कृत्यांबद्दल भारताला ठाम भूमिका यापुढे कणखरपणे घ्यावी लागेल. आज अफगाणिस्तान सोबत करार करून आपण मैत्रीचा मोठाच पल्ला गाठला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. भारताच्या परराष्ट्र नीतीचा हा एक यशस्वी टप्पा आहे, असे आपण सध्या तरी समजले पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### काही ठिकाणच्या

# निवडणुका स्थगित

## नवीन कार्यक्रम जाहीर करण्याचे आयोगाचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांचा तापलेला प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. (सोमवार) रात्री १० वाजता या निवडणुकांसाठीचा प्रचार थांबणार असून त्यानंतर मंगळवारी मतदार मतदान करून आपला कर्तव्य बजावणार आहेत. मात्र, नेमक्या या निर्णायक क्षणी निवडणूक प्रक्रियेबाबत एक महत्त्वाचा घडामोडींचा क्रम समोर आला आहे. राज्यातील बारामती, फलटण आणि महाबळेश्वर या तिन्ही नगरपरिषदेतील निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. जिल्हा न्यायालयात दाखल झालेल्या याचिका आणि तांत्रिक कारणांचा दाखला देत निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.




बारामतीमधील परिस्थिती विशेष चर्चेत आहे. कारण, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी वेळ दुपारी तीन वाजेपर्यंत होती; मात्र प्रक्रिया पावणेतीनलाच थांबवण्यात आल्याचा आरोप झाला. काही उमेदवारांनी अर्ज प्रक्रियेत त्रुटी असल्याचे सांगत न्यायालयीन लढाई उभी केली. जिल्हा न्यायालयाने तर उमेदवारीची तारीख संपल्यानंतरही भाजपच्या दोन उमेदवारांना अर्ज भरू द्यावेत, असे निर्देश दिले. तसेच नगराध्यक्षपदाच्या उमेदवारावरील आक्षेपाबाबत निर्णय प्रलंबित असल्याने अनावश्यक वाद निर्माण होऊ नये, म्हणून आयोगाने निवडणूक पुढे ढकलण्याचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे बारामतीतील नगराध्यक्ष पद आणि सात प्रभागांवरील थेट फैसला आता २० डिसेंबर रोजी होणार आहे.

या पार्श्वभूमीवर ४ डिसेंबर रोजी नव्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होणार आहे. त्यानुसार १० डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची संधी असेल. ११ डिसेंबरला अंतिम उमेदवारांची यादी हाती येणार आहे. तर २० डिसेंबर रोजी मतदान आणि २१ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. विशेष म्हणजे, आधी अर्ज दाखल केलेल्या सात प्रभागांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुभा पुन्हा मिळणार असली, तरी नवीन अर्ज दाखल करता येणार नाहीत. त्यामुळे या ठिकाणी आता राजकीय गणित नव्या पद्धतीने मांडले जाणार आहे.

महाबळेश्वर आणि फलटण नगरपरिषदांमध्येही न्यायालयीन प्रकरणांचा परिणाम जाणवत आहे. दोन्ही ठिकाणच्या काही प्रभागांमध्ये प्रक्रिया व्यवस्थित झाली नसल्याचा दावा करत याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता फलटणमध्ये २० डिसेंबर तर महाबळेश्वरमध्ये २१ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. यामुळे स्थानिक राजकारणात नव्याने खळबळ उडाली आहे आणि प्रचारयुद्धाची घोडदौड आणखी लांबली आहे.

दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यामधील दिग्रस, पांढरकवडा आणि वणी येथील काही प्रभागांच्या निवडणुका देखील पुढे ढकलल्या जाण्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. तांत्रिक कारणे आणि न्यायालयीन प्रक्रिया पाहता हा निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या संदर्भात निवडणूक आयोगाकडून अजून अधिकृत माहिती आलेली नाही. त्यामुळे मतदार, उमेदवार आणि पक्ष कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### वेगवान ट्रकने चिरडले!

## ५ ठार, १२ गंभीर



■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. ३० :

अतिवेगात असलेल्या अनियंत्रित ट्रकखाली चिरडून ५ जणांचा मृत्यू तर १२ जण गंभीर जखमी झाले आहेत. मोतिहारीच्या कोटवानजिक दिल्ली-काठमांडू महामार्गावर घडलेल्या या दुर्घटनेत ८ बाईक आणि १ ईरिक्षा पूर्णपणे चिरडली आहे. संतप्त जमावाने घटनास्थळी गोंधळ घातल्याने काही काळासाठी प्रचंड तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी स्थिती नियंत्रणात आणली.

आज दुपारी १२ वाजताच्या सुमारास दीपऊ नावाच्या फाट्याजवळ, पायी जाणारे लोक, डझनावर बाईकस्वार आणि काही ईरिक्षा उभ्या होत्या. विरुद्ध बाजूने रस्ता दुभाजक तोडून अनियंत्रित वेगाने आलेल्या ट्रकने या लोकांना चिरडले. त्यापैकी ५ जणांचा जागीच मृत्यू झाला तर जवळपास १२ जण गंभीर जखमी झाले आहेत. काय झाले? हे कळेपर्यंत किंचाळ्या आणि ओरडण्याच्या आवाजांनी आसमंत भरला. जखमींना रुग्णालयात नेण्याची धावपळ सुरू असतानाच संतप्त जमावाने पोलिसांशी हुज्जत घातली.

पण, नंतर स्थिती नियंत्रणात आणण्यात पोलिसांना यश आले. दरम्यान, दीपऊ फाट्यावर नेहमीच अपघात होतात आणि इथे अंडरपास किंवा ओव्हरब्रिज बनविण्याची मागणी बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. संतापलेल्या स्थानिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून, तात्काळ यासंबंधी निर्णय घेण्याची मागणी केली.

## राजेश अग्रवाल यांनी स्वीकारला मुख्य सचिव पदाचा पदभार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :



महाराष्ट्र राज्याचा विकास आणि गौरव वाढीसाठी सातत्याने काम करत राहणार, असे प्रतिपादन राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले आहे. राज्याचे मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी रविवारी पदभार स्वीकारला. त्यावेळी ते बोलत होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## दिल्लीतील तिगडी एक्सटेंशनमधील चार मजली इमारतीला आग

### ४ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :

दक्षिण दिल्लीतील तिगडी एक्सटेन्शनमध्ये शनिवारी संध्याकाळी एका फुटवेअरच्या दुकानात भीषण आग लागल्याने भाऊ-बहिणीसह ४ लोकांचा मृत्यू झाला. तर २ जण जखमी झाले आहेत. मृत्यू झालेल्यांमध्ये इमारतीचा मालक सतेंदर आणि त्याची बहीण अनिता यांचाही समावेश आहे. जखमींपैकी एकाचे नाव ममता आहे, ती २५% भाजली आहे. इतरांची ओळख अद्याप पटलेली नाही.

पोलिसांच्या माहितीनुसार, संध्याकाळी ६ वाजता त्यांना एक पीसीआर कॉल आला, ज्यात तिगडी एक्सटेन्शनमधील बुटांच्या दुकानाला आग लागल्याचे सांगण्यात आले. आगीने संपूर्ण इमारतीला वेढले होते. त्यानंतर आग विझवण्यासाठी ४ अग्निशमन दलाच्या गाड्या पाठवण्यात आल्या होत्या. आग लागण्याचे कारण शोधण्यासाठी पुरावे गोळा केले जात आहेत.

पोलिसांनी सांगितले की, लोकांचे म्हणणे आहे की, वरच्या मजल्यावर राहणाऱ्या लोकांनी छतावर पळून जाऊन आपला जीव वाचवला. आग वरच्या मजल्यावर पोहोचताच ममता नावाच्या महिलेने स्वतःला वाचवण्यासाठी पहिल्या मजल्यावरून उडी मारली. यावेळी त्यांना दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

डीसीपी अंकित चौहान यांनी सांगितले की, गल्ली अरुंद असल्यामुळे आणि आग लागलेले ठिकाण आतल्या बाजूला असल्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना तिथे पोहोचण्यात खूप अडचणी आल्या. अथक प्रयत्नांनी आग विझवल्यानंतर अग्निशमन विभागाने शोधमोहीम राबवली असता ग्राउंड फ्लोअरवर आतून ३ जळालेले मृतदेह आढळले. आगीत गंभीररित्या भाजलेल्या अनिताने उपचारादरम्यान प्राण सोडले. पोलिसांनी चारही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत.

### वसंत कुंजमध्ये मर्सिडीजची धडक

## ३ कर्मचाऱ्यांना चिरडले

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :

दिल्लीच्या वसंत कुंज परिसरात रविवारी रात्री उशिरा एक भीषण रस्ता अपघात झाला. एका भरधाव वेगाच्या मर्सिडीज कारने ऑटो-रिक्षा स्टँडवर उभ्या असलेल्या तीन जणांना धडक दिली. एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. दिल्ली पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतले आहे. वसंत कुंज उत्तर पोलिस ठाण्याला पहाटे २:३३ वाजता ॲम्बियन्स मॉलच्या अगदी समोर, वसंत विहारकडे जाणाऱ्या नेल्सन मंडेला मार्गावर झालेल्या अपघाताबद्दल पीसीआर कॉल आला. पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना अपघातग्रस्त मर्सिडीज जी ६३ कार आढळली. ऑटो-रिक्षा स्टँडवर २३, ३५ आणि २३ वर्षांचे तीन जण जखमी अवस्थेत आढळले. ते ॲम्बियन्स मॉलमधील एका रेस्टॉरंटचे कर्मचारी होते. तिन्ही जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय तपासणीदरम्यान, उत्तराखंडमधील चमोली येथील रहिवासी रोहित (२३) याला मृत घोषित करण्यात आले. इतर दोन जखमींवर उपचार सुरू आहेत. दिल्ली पोलिसांनी अपघातासाठी जबाबदार असलेल्या मर्सिडीज कारचा चालक शिवम (२९) याला ताब्यात घेतले आहे.

## आजपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन

■ वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि. ३० :

१ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी आज सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू संसदेच्या दोन्ही सभागृहांमधील राजकीय पक्षांच्या गटनेत्यांशी चर्चा करतील.

अधिवेशनादरम्यान लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी सरकार सर्व राजकीय पक्षांकडून सहकार्य मागेल. किरेन रिजिजू यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये विरोधी पक्षांना दोन्ही सभागृहांच्या कामकाजात पूर्णपणे सहभागी होऊन योगदान देण्याचे आवाहन केले. संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबर ते १९ डिसेंबरपर्यंत चालेल.

### स्पेशल सेलची धडधडीत छापेमारी

## 3 हून अधिक दहशतवादी अटक

■ वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि. ३० :

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलला मोठे यश मिळाले आहे. त्यांनी तीन हून अधिक दहशतवाद्यांना अटक केली आहे. हे दहशतवादी पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेशी संबंधित असलेल्या शहजाद भट्टीशी संबंधित होते. अटक केलेले सर्व दहशतवादी उत्तर भारतातील रहिवासी आहेत.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने तीन हून अधिक दहशतवाद्यांना अटक केली आहे. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पंजाबमध्ये या अटक करण्यात आल्या आहेत.

## छत्तीसगडमध्ये ३७ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण



■ वृत्तसंस्था, दंतेवाडा, दि. ३० :

छत्तीसगडमधील नक्षलवादाच्या मुळावर घाव घालण्यात आयटीबीपीने निर्णायक यश मिळवले आहे. अबूझमाडच्या दुरागम व घनदाट प्रदेशात महत्त्वपूर्ण तळ स्थापन करून एका वर्षात या दलाने रणनीतिक मोचार्बांधणी पूर्ण केली. या पावलामुळे नक्षलवाद्यांचा शेवटचा मोठा आंतरराज्य मार्ग बंद झाला असून त्यांच्या हालचालींवर मोठी मयार्दा आली आहे.

दरम्यान दंतेवाड्यातही सुरक्षा यंत्रणांनी मोठी बाजी मारली. येथे तब्बल ३७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले असून त्यापैकी २७ जणांवर एकूण ६५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. या घडामोडींमुळे राज्यात नक्षलविरोधी मोहिमेला नवसंजीवनी मिळाली असून उर्वरित उग्रवादी गटांवर मानसिकदृष्ट्या मोठा दबाव निर्माण झाला आहे. समर्पण केलेल्या नक्षलवाद्यांत तब्बल १२ महिला सदस्यांचाही समावेश आहे. ही मंडळी पूर्वी अनेक चकमकींमध्ये सक्रिय होती.

त्यापैकी काहीजण मार्च २०२० मध्ये मिनपा परिसरातील अरण्यात झालेल्या त्या भीषण चकमकीशी जोडलेले होते, ज्यात २६ जवानांनी प्राणाची आहुती दिली होती आणि जवळपास २० जवान जखमी झाले होते. २०२० मधील या हल्ल्यात तसेच नंतरच्या नक्षलवादी हिंसाचारात त्यांची मुख्य भूमिका असल्याचे सुरक्षा यंत्रणांचे म्हणणे आहे.

याचपैकी काही नक्षलवादी २०२४ मध्ये थूलथूली भागात घडलेल्या चकमकीत देखील सहभागी होते. आता त्यांनी शस्त्रं खाली ठेवत आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारल्याने नक्षल मोर्च्यावर सुरक्षिततेचा तोल अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होते.

### नॅशनल हेराल्ड प्रकरणी

# सोनिया-राहुलवर गुन्हा दाखल

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :

दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने नॅशनल हेराल्ड प्रकरणात सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात नवीन एफआयआर दाखल केला आहे. यात त्यांच्या व्यतिरिक्त इतर सहा लोक आणि तीन कंपन्यांची नावे समाविष्ट आहेत. या तीन कंपन्या आहेत - एजेएल, डोटेक्स मर्चेंडाइज आणि यंग इंडियन. या सर्वांवर असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड फसवणुकीने मिळवल्याचा आरोप आहे.

तक्रारीनुसार, २०१० मध्ये एजेएलकडे सुमारे २,००० कोटी रुपये किमतीची मालमत्ता होती. कोलकाता येथील डोटेक्स मर्चेंडाइजने यंग इंडियनला १ कोटी रुपये दिले, त्यानंतर यंग इंडियनने कॉंग्रेसला ५० लाख रुपये देऊन एजेएलवर नियंत्रण मिळवले. यंग इंडियनमध्ये राहुल आणि सोनिया गांधी यांची ७६% भागीदारी आहे.

३ ऑक्टोबर रोजी ईडीच्या हेडक्वार्टर्स इन्व्हेस्टिगेशन युनिटच्या तक्रारीवरून एफआयआर दाखल करण्यात आला होता. ईडीने २००८ ते २०२४ पर्यंतचा आपला तपास अहवाल शेअर केला होता, ज्याच्या आधारावर ही कारवाई झाली. याची माहिती शनिवारी समोर आली.



सूत्रांनुसार, दिल्ली पोलीस लवकरच एजीएलच्या भागधारकांना बोलावू शकते, या हस्तांतरणापूर्वी कॉंग्रेसने त्यांची परवानगी घेतली होती का, हे जाणून घेण्यासाठी. कॉंग्रेसने या आरोपांना राजकीय सूडबुद्धीची कारवाई म्हटले आहे आणि त्यांना एफआयआरची माहिती नसल्याचे म्हटले आहे.


दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ३ ऑक्टोबर रोजी नवीन एफआयआर दाखल केली होती. याची माहिती २९ नोव्हेंबर रोजी समोर आली. दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ३ ऑक्टोबर रोजी नवीन एफआयआर दाखल केली होती. याची माहिती २९ नोव्हेंबर रोजी समोर आली.

भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी २०१२ मध्ये दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयात याचिका दाखल करून सोनिया गांधी, राहुल गांधी आणि कॉंग्रेसचेच मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांच्यावर तोट्यात चाललेल्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राला फसवणूक आणि पैशांची अफरातफर करून हडपल्याचा आरोप केला होता.

आरोपांनुसार, कॉंग्रेस नेत्यांनी नॅशनल हेराल्डच्या मालमत्तांवर ताबा मिळवण्यासाठी यंग इंडियन लिमिटेड ही संस्था स्थापन केली आणि त्याद्वारे नॅशनल हेराल्डचे प्रकाशन करणाऱ्या असोसिएटेड जर्नल लिमिटेडचे बेकायदेशीर अधिग्रहण केले.

## भारताचे आफ्रिकेला ३५० धावांचे आव्हान

■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क दि. ३०:



मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर ३५० धावांचे लक्ष्य ठेवले आहे. रविवारी रांचीच्या जेएससीए स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडेन मार्करामने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने २५ धावांवर यशस्वी जयस्वालची (१८ धावा) विकेट गमावली. तेथून रोहित-कोहली जोडीने मजबूत धावसंख्येचा पाया रचला. रोहितने ५१ चेंडूत ५७ धावा केल्या, तर विराट कोहलीने १२० चेंडूत १३५ धावा केल्या. दोघांनी १३६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. रोहित आणि कोहली व्यतिरिक्त, कर्णधार केएल राहुल आणि रवींद्र जडेजा यांनी धावसंख्या ३५० पर्यंत नेली.

### भाजपचा नगरपालिका निवडणुकीचा अंतर्गत सर्व्हे आला समोर

# १७५ नगराध्यक्ष निवडून येण्याचा अंदाज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

राज्यातील 246 नगरपालिका आणि 42 नगरपंचायतींच्या निवडणुकांची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रचार तोफा थंडावण्यास अवघे दोन दिवस उरले असतानाच भाजपने आपल्या अंतर्गत सर्वेक्षणाचे आकडे समोर आणत विरोधकांचे धाबे दणाणून सोडले आहेत. भाजपच्या अंतर्गत सव्हेर्नुसार, राज्यात पक्षाचे तब्बल 175 नगराध्यक्ष विजयी होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालात भाजपच मोठा भाऊ ठरणार, असा विश्वास पक्षश्रेष्ठींकडून व्यक्त केला जात आहे.

येत्या नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी 2 डिसेंबरला मतदान प्रक्रिया पार पडणार असून, 3 डिसेंबरला निकाल लागणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांनी



राज्यभरात झंझावाती प्रचार दौरे केले आहेत.

राज्यात नगराध्यक्षपदासाठी 242 ठिकाणी भाजपचे उमेदवार थेट कमळ चिन्हावर लढत आहेत, तर 46 ठिकाणी महायुतीचे उमेदवार रिंगणात आहेत. सर्वाधिक जागांवर उमेदवार असल्याने आणि प्रचारातील प्रतिसादावरून भाजपला 175 हून अधिक नगराध्यक्षपदे मिळण्याचा अंदाज सर्वेक्षणात वर्तवण्यात आला आहे.

भाजपने या निवडणुकीत विकासाचा अजेंडा राबवला आहे. मतदारांना केंद्रातील आणि राज्यातील योजना, तसेच शहरांसाठी वाढीव निधीचे आश्वासन दिले जात आहे. भाजपच्या या आक्रमक प्रचारनीतीमुळे आणि अंतर्गत सर्व्हेंच्या आकडेवारीमुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास दुप्पट झाला आहे. आता 3 डिसेंबरला मतपेटीतून येणारा कौल हा भाजपच्या अंतर्गत सव्हेर्नुसार लागतो का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

दरम्यान, भाजपचे नेते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पक्षाच अंतर्गत सर्व्हे येण्याआधीच आम्ही 200 नगराध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला होता. "महाराष्ट्रात भाजपने 256 ठिकाणी उमेदवार दिले आहेत.

त्यापैकी आम्ही किमान 200 नगराध्यक्षपदाच्या निवडणुका जिंकू. आमच्या सभांना मिळणारा प्रतिसाद हा उत्स्फूर्त आहे, ही धरून आणलेली गर्दी नाही. बिहार विधानसभा आणि नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निकालासारखेच यश भाजपला या निवडणुकीत मिळेल," असे ते म्हणाले होते.

# चाकणमध्ये भीषण आग

### कंटेनरमधील ४० ई-स्कुटर जळून खाक

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

पुणे जिल्ह्यातील चाकण परिसरात पहाटेच्या सुमारास एक मोठी दुर्घटना टळली आहे. तळेगाव-चाकण रस्त्यावरील खराबवाडी गावात असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ डिझेल भरण्यासाठी आलेल्या एका मोठ्या कंटेनरला अचानक आग लागण्याची घटना घडली. या कंटेनरमध्ये 40 नवीन इलेक्ट्रिक दुचाकी ठेवण्यात आल्या होत्या. कंटेनर पूर्णपणे पेटल्याने या सर्व बाइक काही क्षणातच जळून खाक झाल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी या घटनेत झालेली नाही. मात्र रात्री शांत असलेल्या या परिसरात अचानक पेटलेल्या मोठ्या आगीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. ही आग नेमकी कशी लागली याचा तपास सुरू असून, प्राथमिक माहितीनुसार आग लागण्याचं कारण समजू शकलेले नाही.

ही घटना पहाटेच्या सुमारास घडली. NL-01अए-7346 असा क्रमांक असलेला हा कंटेनर डिझेल भरण्यासाठी पेट्रोल पंपावर आला होता. कंटेनर चालकाने त्यासाठी आपल्या मालकाला फोन केला होता. मात्र मालकाने फोन न उचलल्याने चालकाने कंटेनर पंपाच्या शेजारीच उभा केला. तो काही काळ तिथेच थांबून मालकाशी संपर्क करण्याचा प्रयत्न करत होता. तेवढ्यात एका रस्त्याने जाणाऱ्या नागरिकाने कंटेनरमधून धूर येत असल्याचे चालकाला सांगितले. सुरुवातीला चालकाला काहीतरी किरकोळ दोष वाटला. पण धूर वाढत चालल्याने त्याने तातडीने परिस्थिती बघण्यासाठी कंटेनरचा मागील दरवाजा उघडला आणि क्षणाचा अवधी न लागता आगीच्या प्रचंड लाटा बाहेर पडल्या. समोर पेटलेल्या दुचाक्या पाहून तो हादरून गेला. चालकाने लगेच मदतीसाठी आरडाओरडा केला. कामगारांनीही स्वतःचे जीव वाचवणेच पसंत केले.

ही आग पेट्रोल पंपाच्या अगदी शेजारी लागल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती. पेट्रोल पंपावर इंधनाचे मोठे टँक असतात. थोडा जरी विलंब झाला असता किंवा आग पंपापर्यंत पोहोचली असती तर मोठा स्फोट होऊन व्यापक हानीकारक घटना घडली असती. मात्र पंपावरील कर्मचारी आणि चालकाने तातडीने पोलिस व अग्निशमन दलाला कळवले. काहीच मिनिटांत महाळुंगे पोलिस ठाण्याचे पथक तसेच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशामक कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग पसरू न देण्याचा प्रयत्न केला आणि अखेरीस आगीवर नियंत्रण मिळवले.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांची एकच धांदल उडाली. पहाटेचा वेळ असल्याने गावात शांतता होती. पण अचानक आगीचा धूर आणि आवाज ऐकूण जागे झालेले लोक घटनास्थळी धावले. मात्र पोलिसांनी सुरक्षा लक्षात घेऊन त्या परिसरात गर्दी रोखली. विशेष म्हणजे ज्या इलेक्ट्रिक बाइक्स जळून नष्ट झाल्या त्या सर्व नवीन होत्या. त्यांची डिलिव्हरी विविध ठिकाणी करण्यासाठी हा कंटेनर निघाला असल्याचे समोर आले आहे. लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# माझ्यापेक्षा जास्त अधिकार मुख्यमंत्र्यांकडे

### 'तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे' या वक्तव्यावरून अजित पवारांची सारवासारव

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ३० :

"माझ्या हातात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत," या विधानावरून महायुतीत नाराजीचे सूर उमटल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता सारवासारव केली आहे. "ते विधान मी ओघात बोललो होतो. तिजोरी माझ्या किंवा कुणाच्या बापाची नाही, ती जनतेची आहे. तसेच माज्यापेक्षा जास्त अधिकार हे मुख्यमंत्र्यांनाच आहेत," असे स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिले.



राज्यात नगरपालिका आणि नगर परिषदेच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. अनेक ठिकाणी महायुतीमधील पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. त्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका सभेत बोलताना तुम्ही राष्ट्रवादीच्या उमेदवारांना मतदान करा, तुमच्या भागाला निधी कमी पडू देणार नाही. तुमच्या हातात मत आहे, तर माज्या हातात निधी आहे. असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनीही अजित पवारांच्या हातात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीला मतदान केल्यास निधी मिळेल, असे म्हटले होते. यावरून भाजप नेत्यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला होता. आता अजित पवारांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली आहे.

भोर नगरपालिका निवडणूक प्रचारानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नुकतीच जाहीर सभा पडली. या सभेत बोलताना त्यांनी तिजोरीच्या चाव्यावरील विधानावर स्पष्टीकरण दिले. "मी परवा बोलताना म्हणालो होतो की चाव्या माज्याकडे आहेत, पण तो केवळ बोलण्याचा एक भाग होता. लगेच काहींनी (भाजप नेत्यांनी) आठवण करून दिली की चावी तुमच्याकडे असली तरी तिजोरी आमच्या खोलीत आहे. अरे, पण कोणाच्याही खोलीत तिजोरी असू द्या, तिजोरी ही जनतेची आहे. ती माज्या किंवा इतर कुणाच्या बापाची नाही, हे सत्य आहे," असे अजित पवार म्हणाले.

महायुतीमध्ये तिजोरीच्या अधिकारांवरून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न करताना अजित पवार म्हणाले, "माज्याकडे अर्थमंत्री म्हणून अधिकार आहेतच, त्याआधारे विकासाला मदत करणे हे माझे कर्तव्य आहे. पण, माज्यापेक्षा जास्त अधिकार नक्कीच मुख्यमंत्र्यांकडे आहेत, हे मी मान्य करतो."

यावेळी अजित पवारांनी आपल्या उमेदवारांच्या चारित्र्यावर भर देत विरोधकांवर, विशेषतः काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे आणि स्थानिक विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. "माज्या पक्षाच्या उमेदवारांवर नजर टाका. रामचंद्र आवारे यांच्यासारख्या स्वच्छ प्रतिमेच्या व्यक्तीला मी नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. मी 'दोन नंबर'चे धंदे करणाऱ्यांना उमेदवार केलेले नाही. इतर पक्षांनी कुणाला उमेदवारी दिली आहे, ते तुम्हीच तपासा," असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

## पंचतारांकित हॉटेल बॉम्बने उडवण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३० :

"हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवला आहे, तात्काळ हॉटेल रिकामे करा," शुक्रवारी दुपारी हॉटेलच्या लँडलाईनवर खणखणलेल्या या एका फोनमुळे कोरेगाव पार्कमधील एका प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलमध्ये एकच खळबळ उडाली. या धमकीमुळे पोलिस यंत्रणा आणि बॉम्ब शोधक पथकाची चांगलीच धावपळ झाली. मात्र, हॉटेलची कसून तपासणी केल्यानंतर हा फोन बनावट असल्याचे स्पष्ट झाले आणि हॉटेल प्रशासन व ग्राहकांनी सुटकेचा निश्वास टाकला.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, शुक्रवारी (ता. 29) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. कोरेगाव पार्क भागातील एका नामांकित पंचतारांकित हॉटेलच्या लँडलाईनवर एका अज्ञात मोबाइल क्रमांकावरून फोन आला. फोनवरील व्यक्तीने हॉटेल बॉम्बने उडवून देण्याची धमकी देत हॉटेल रिकामे करण्यास सांगितले.

# विवाहित प्रेयसीची गळा दाबून हत्या

■ महासागर प्रतिनिधी,
पिंपरी चिंचवड, दि. ३० :

विवाहित प्रेयसीची विवाहित प्रियकराने गळा दाबून हत्या केल्याची धक्कादायक घटना वाकड परिसरातून समोर आली आहे. राणी विशाल गायकवाड हिने सतत सोबत राहण्याचा आणि लग्नाचा आग्रह धरत असल्याने आरोपी प्रियकराने अत्यंत टोकाचे पाऊल उचलल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. ही हत्या धाराशीव जिल्ह्यातील ढोकी गावाजवळ करण्यात आली असून पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेहावर पेट्रोल टाकून जाळण्यात आला. या प्रकरणात वाकड पोलिसांनी अनिकेत महादेव कांबळे (३३) याला अटक केली आहे.



२६ नोव्हेंबर २०२५ रोजी राणी गायकवाड ही राहत्या घरातून बेपत्ता झाली होती. याबाबत तिच्या कुटुंबियांनी वाकड पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. महिला बेपत्ता असल्याने पोलिसांनी तपास अधिक गतीने सुरू केला.

राणीच्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले असता, ती शेवटच्या वेळेस प्रियकर अनिकेत कांबळे यांच्या संपर्कात असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी अनिकेतला चौकशीसाठी बोलावले. सुरुवातीला त्याने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच गुन्ह्याची कबुली दिली.

राणी गायकवाड आणि अनिकेत कांबळे हे दोघेही विवाहित असून दोघांनाही मुले आहेत. त्यांच्या प्रेमसंबंधांची कल्पना राणीच्या कुटुंबाला लागली होती. त्यामुळे राणी अनिकेतला सोबत राहण्याचा आणि लग्नाचा तगादा लावत होती.

२६ नोव्हेंबर रोजी अनिकेतने राणीला भेटण्यासाठी बोलावले. दोघेही गाडीतून फिरत असताना राणीने पुन्हा लग्नाचा तगादा लावल्याने वाद झाला. यावेळी आधीच योजना आखलेल्या अनिकेतने तिला गावी जाऊ असे सांगत गाडी धाराशीव जिल्ह्याच्या दिशेने वळवली. २७ नोव्हेंबरच्या पहाटे ढोकी गावाजवळ आल्यावर, राणी झोपेत असताना अनिकेतने तिचा गळा दाबून हत्या केली. त्यानंतर डोक्यात लोखंडी रॉडने वार करण्यात आले. गंभीर जखमांमुळे तिचा जागीच मृत्यू झाला.

# सोनिया गांधींच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा, कर्तव्य, त्याग' सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ३० :

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त २ ते ९ डिसेंबर या कालावधीत 'सेवा, कर्तव्य, त्याग सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते २ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता एस.एम. जोशी सभागृह येथे या सप्ताहाचे उद्घाटन होईल. सप्ताहाचे संयोजक आणि प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पंतप्रधान पदाचा त्याग करून भारतीय लोकशाहीत सोनिया गांधी यांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या योगदानाच्या स्मरणार्थ २००४ पासून दरवर्षी 'सेवा, कर्तव्य, त्याग सप्ताह' आयोजित केला जातो.

या सप्ताहात प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवलेल्या कष्टकरी पालक आणि त्यांच्या पाल्यांना 'फिनिक्स पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, 'सोनिया नारी शक्ती पुरस्कारा'चेही वितरण समारंभपूर्वक केले जाईल.

आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण आणि रोजगार निर्मिती या विषयांवर आधारित विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये मेगा आरोग्य शिबिर, नित्योपयोगी वस्तूंचे वाटप, अन्नदान, दिव्यांगांना साहित्याचे वाटप, ज्येष्ठ नागरिक गरीब योजना कार्डांचे वितरण, ५०० मुलींना सुकन्या समृद्धी कार्डांचे वाटप, वृक्षारोपण आणि परिसर स्वच्छता मोहिमांचा समावेश आहे.

याशिवाय, दोन दिवसीय भव्य रोजगार मेळावा, ग्रंथ जागृती कार्यक्रम, विविध क्रीडा स्पर्धा आणि महिला बचतगट मेळावा व मार्गदर्शन सत्रे आयोजित केली आहेत. क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेचा समावेश असून, त्यात ३२ संघ सहभागी होणार आहेत.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सादर केलेल्या 'व्होट चोरी'च्या सादरीकरणावर आधारित माहितीपर प्रदर्शनही भरवले जाईल. मल्टीमीडियाच्या माध्यमातून मतदार याद्यांमधील फेरफार आणि संशयास्पद मतदार डेटा यावर राहुल गांधींनी मांडलेली तथ्ये सादर केली जातील. ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांची 'भारतीय संविधान' या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत, ज्यात नागरिकांचे हक्क, कर्तव्ये आणि लोकशाहीसमोरील आव्हानांवर चर्चा होईल. या सप्ताहातील विविध कार्यक्रमांना माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी मंत्री सतेज पाटील, यशोमती ठाकूर, विश्वजित कदम आणि ज्येष्ठ नेते उल्हास पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### जिकडे 'बॉम्बे' असेल, तिकडे आम्ही 'मुंबई' करू

# उद्धव ठाकरेंचा एल्गार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

"मुंबईत सध्या सोयीऐवजी गैरसोयीच वाढत आहेत. राज्यकर्ते अकलेचे तारे तोडत आहेत. पण आम्ही हे खपवून घेणार नाही. आम्हाला हिंदीचा द्वेष नाही, पण सक्ती मान्य नाही. त्यामुळे आता जिकडे जिकडे 'बॉम्बे' असेल, तिकडे आम्ही 'मुंबई' करू," असा एल्गार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. चारकोप येथील मालवणी महोत्सवात बोलताना त्यांनी ही भूमिका मांडली.



चारकोप विधानसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना उद्धव ठाकरे यांनी कांदिवली पश्चिम येथील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेतल्या आणि त्यानंतर मालवणी महोत्सवाला हजेरी लावली. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी मुंबईच्या सद्य-स्थितीवर बोट ठेवले. "मुंबईत ट्रॅफिकची समस्या भयंकर झाली असून हवेची गुणवत्ताही खालावत चालली आहे. मुंबईत नागरिकांसाठी सोयी कमी आणि गैरसोयीच जास्त वाढत आहेत," अशी टीका त्यांनी केली.

ठाकरे म्हणाले, मराठी हळुवारपणे मारत चालले आहेत. आम्ही मराठी मारु देणार नाही. दिल्लीचे तक्त राखतो महाराष्ट्र माझा हे गाणे आहे. हिंदीची सक्ती करु नका. आम्हाला हिंदीचा द्वेष नाही, पण हिंदी सक्ती करू नका. त्यांचा एक मंत्री येऊन गेला सांगून गेला आयआयटी बॉम्बे आमच्याकडून राहून गेले. पण आम्ही सांगतोय जिथे जिथे बॉम्बे आहे तिथे तिथे मुंबई करु. याच्या विरुद्ध लढा द्यायचा आहे. हा आपला बालेकिल्ला आहे इथे भगवाच फडकणार. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना ठाकरे म्हणाले, "पंतप्रधान 'वन नेशन वन इलेक्शन'ची भाषा करतात, पण आम्ही सांगतो 'वन नाव, वन मत' पक्ष चोरले आहे.

# युतीत जागेसाठी भीक मागावी लागते

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा रंग चांगलाच चढलेला असताना, महायुतीतीलच मित्र पक्षांमध्ये तणाव निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसू लागले आहे. नुकतंच केंद्रीय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे (आरपीआय) प्रमुख रामदास आठवले यांनी केलेल्या विधानानंतर महायुतीत अस्वस्थता निर्माण झाली आहे. पिंपरी-चिंचवड येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी महायुतीत आरपीआयला जागा मिळवण्यासाठी अक्षरशः भीक मागावी लागते, अशी खंत व्यक्त केली.



इतर पक्ष निवडणुका आल्या की सर्व जागा लढण्याचा निर्धार करतात. पण आमच्या पक्षाची परिस्थिती वेगळी आहे. आम्हाला जागांसाठी विनंती, विनवण्या कराव्या लागतात. आम्हीही या देशाच्या राजकारणात आहोत, आम्हालाही लढायचंय, पण आमच्या पक्षाला मिळणाऱ्या जागांची अवस्था दयनीय आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या या भाषणाने एकच खळबळ उडाली असून आरपीआय आता स्वबळावर उतरणार का? असा प्रश्न सामन्यातील राजकीय वतुर्ळात मोठ्या प्रमाणात उपस्थित केला जात आहे.

युती टिकवण्याचा प्रयत्न करत असतानाही त्यांनी विरोधी पथकांसारख्या विधानांचा सूर लावला. पिंपरीझचिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भाजपसोबत युती व्हावी असा त्यांचा स्पष्ट प्रयत्न आहे. त्यांनी युतीसाठी 8 ते 9 जागांचा दावा केल्याचेही यावेळी नमूद केले. मात्र, जर भाजपने त्यांची मागणी मान्य केली नाही तर शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षासोबतही हात मिळवण्यास ते मागे-पुढे पाहणार नसल्याचे स्पष्ट संकेत त्यांनी दिले. त्यांच्या या वक्तव्यामुळे महायुतीच्या अंतर्गत समीकरणांवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ते उघडपणे पर्याय शोधू लागले आहेत, हेच त्यांच्या विधानातून समोर आले.

राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी प्रचाराची मुदत आता केवळ काही तासांवर आली आहे. संपूर्ण राज्यात 280 ठिकाणी निवडणुका होत आहेत. त्यापैकी 256 ठिकाणी महायुतीतील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपचे कमळ चिन्हावर उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मात्र, उर्वरित ठिकाणी महायुतीतील घटकच परस्परांसमोर उभे ठाकलेले दिसत आहेत. त्यामुळे जनता आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. याच पार्श्वभूमीवर आता रामदास आठवले यांची नाराजी बाहेर आली आहे. गेल्या काही वर्षात महायुती टिकवण्यासाठी त्यांनी सातत्याने साथ दिली असतानाही त्यांच्या पक्षाला मिळणाऱ्या जागांचे गणित हितकारक नसल्याची नाराजी त्यांनी उघडपणे व्यक्त केली.

आरपीआयला महायुतीत नैसर्गिक स्थान असले तरी अनेक वेळा तडजोड करावी लागते, ही त्यांच्या भाषणातून दिसणारी वेदना आहे. जेव्हा मतांची गरज असते, तेव्हा आमचे महत्त्व आठवते. पण जागा देताना आम्हाला महत्त्व दिले जात नाही. ही परिस्थिति बदलायला हवी, असे आठवले म्हणाले. त्यांचा सूर केवळ निवडणुकीपुरता नव्हता, तर भविष्यातील मोठ्या राजकीय समीकरणांना संदेश देणारा होता.

## आंबेडकर टूर सर्किट : बाबासाहेबांशी संबधित स्थळांना भेट द्या

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३० :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिन आहे. यानिमित्ताने राज्य शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत ३ ते ५ डिसेंबर दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटचे आयोजन केले आहे. मुंबईतील चैत्यभूमी येथे भेट देणारे पर्यटक तसेच अनुयायींसाठी टूर सर्किट निःशुल्क आहे, अशी माहिती राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

**राज्य शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत आयोजन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यटन सर्किट ही केवळ एक पर्यटन संकल्पना नसून, भारताच्या लोकशाहीचा पाया रचणाऱ्या महामानवाच्या विचारांना अभिवादन करण्याची संधी आहे. या परिपथामुळे अनुयायी व पर्यटकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबधित मुंबईतील स्थळांना भेट देण्याची आणि त्यांच्या विचारसंपदेचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळेल. हा केवळ प्रवास नसून, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मूल्यांची अनुभूती आहे.

या आंबेडकर टूर सर्कीट अंतर्गत दररोज ३ बसेस उपलब्ध करण्यात असून प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश देण्यात येणार आहे. सहलीमध्ये सहभागी होणारे पर्यटक, अनुयायी यांच्यासाठी निःशुल्क प्रवास, सहल मार्गदर्शक, अल्पोपहार आहे. या सोयी-सुविधा राज्य शासनाच्या पर्यटन संचालनालयाद्वारे पुरविण्यात येणार आहेत.

# मीनाक्षी निकम यांना बाया कर्वे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३० :

प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या आणि स्वयंदीप अपंग विकास संस्थेच्या संस्थापक मीनाक्षी निकम यांना यंदाचा 'बाया कर्वे राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतर्फे हा पुरस्कार सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल देण्यात आला. कर्वे दांपत्याने उभारलेल्या मंदिराच्या पायरीचा दगड होता आले, हे मी माझे भाग्य समजते, असे मनोगत निकम यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केले.

हा पुरस्कार प्रसिद्ध कान, नाक, घसा तज्ज्ञ आणि कॉक्लीअर इम्प्लांट विशेषज्ज्ञ डॉ. अविनाश वाचासुंदर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कर्वे नगर येथील रमा पुरूषोत्तम विद्या संकुल येथे हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्मिता घैसास, कार्याध्यक्ष रवींद्र देव, उपकार्याध्यक्ष विद्या कुलकर्णी, उपाध्यक्ष स्मिता कुलकर्णी, सचिव डॉ. पी. व्ही. एस. शास्त्री आणि विश्वस्त पुरूषोत्तम लेले उपस्थित होते.

पुरस्कार निवड समितीचे सदस्य डेक्कन अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रसाद जोशी आणि




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्य भाग्यश्री मंठाळकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

मीनाक्षी निकम यांनी पुरस्काराला उत्तर देताना सांगितले की, स्वतः दिव्यांग असल्याने त्यांना दिव्यांगांच्या रोजच्या जगण्यातील आव्हानांचा अनुभव होता. यामुळे दिव्यांगांसाठी रचनात्मक काम करण्याची इच्छा बळावली. वयाच्या ३२ व्या वर्षी आईला आलेल्या वैधव्यामुळे समाजातून नाकारलेपणाला सामोरे जावे लागले. हा नाकारलेपणा झुगारून आज त्यांची संस्था दिव्यांग आणि विधवा यांच्यासाठी काम करत आहे.

त्या म्हणाल्या की, दिव्यांगांच्या बाबतीत आजही शहरी आणि ग्रामीण स्तरावर स्वीकारार्हता दिसून येत नाही. त्यांना सहानुभूती नव्हे, तर संधी आणि हातांना काम पाहिजे आहे. दिव्यांगांचे सक्षमीकरण करण्यासाठी संस्थेतर्फे प्रशिक्षण आणि रोजगाराचा मेळ घातला जातो. कोणताही पुरस्कार हा सन्मानाबरोबरच जबाबदारी आणि विश्वास वाढवणारा असतो, असेही त्यांनी नमूद केले.

### तळेगावमध्ये सहा, लोणावळ्यात दोन प्रभागातील निवडणूक स्थगित

■ महासागर प्रतिनिधी, पिंपरी, दि. ३० :

न्यायालयीन अपील दाखल झालेल्या तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या सहा आणि लोणावळ्यातील दोन प्रभागातील निवडणूक स्थगित झाली आहे. या जागांसाठी सुधारित कार्यक्रम जाहीर झाला असून २० डिसेंबर रोजी मतदान आणि २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल, तर दोन डिसेंबर रोजी ज्या जागांसाठी मतदान होणार आहे. त्याच्या प्रचाराची सांगता सोमवारी (एक डिसेंबर) रोजी रात्री दहा वाजता होईल. मंगळवारी मतदान आणि बुधवारी मतमोजणी होणार आहे.

तळेगाव दाभाडे येथील प्रभाग दोन अ, प्रभाग सात अ आणि ब, प्रभाग आठ अ व ब आणि प्रभाग दहा मधील ब अशा सहा जागेवरील निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. प्रभाग आठ ब या जागेवर आमदार सुनील शेळके यांचे बंधू सुदाम शेळके निवडणूक लढवत आहेत. निवडणूक स्थगित झालेल्या ठिकाणी नवीन अर्ज स्वीकारला जाणार नाही. केवळ अर्ज मागे घेण्यासाठी मुदत दिली जाणार आहे.

महासागर ●सोमवार,दि.१ डिसेंबर २०२५
अकोला पान ३

# महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३६ आदेश

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

नगर परिषद व नगर पंचायत निवडणूक २०२५ प्रक्रीया सुरु झालेली आहे. दि. २ डिसेंबर रोजी मतदान व दि. ३ डिसेंबर रोजी मतमोजणी व दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी निकाल प्रसिध्दी करण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यात वरिल काळामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांनी कलम ३६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम नुसार प्राप्त असलेले अधिकारान्वये नगर परिषद, नगर पंचायत बाळापुर, मुर्तिजापुर, अकोट, तेल्हारा, हिवरखेड, बार्शिटाकळी तालुक्यातील सर्व पोलीस उपनिरिक्षक व त्यांचेपेक्षा वरिल दर्जाचे अधिकाऱ्यांना दि. ४ डिसेंबर २०२५ चे रात्री १२ वाजेपर्यंत खालील अधिकार प्रदान करीत आहे.

रस्त्यावरुन जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोक कशा रितीने चालतील त्यांची वर्तणुक कशी असावी ? याविषयी निर्देश देणे. मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी उपासनेच्या सर्व जागेचे आसपास, उपासनेच्या वेळी व कोणत्याही रस्त्याने किंवा सार्वजनिक जागी किंवा लोकांच्या एकत्र जमण्याच्या जागी गर्दी होणार असेल किंवा अडथळा निर्माण होण्याचा संभव असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा होवू न देणे. अशा कोणत्याही मिरवणुका ज्या मार्गाने जाव्यात किंवा ज्या मार्गाने जावू नयेत ते विहीत करणे. सर्व रस्त्यावर व नदयांचे घाटावर आणि सार्वजनिक स्नानाचे, कपडे धुण्याचे, उतरण्याचे ठिकाणी जागेमध्ये देवालय किंवा इतर सार्वजनिक किंवा लोकांच्या जाण्या येण्याच्या जागेमध्ये बंदोबस्त व सुव्यवस्था राखणे.

# जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून सायक्लोथॉन; अकोलेकरांचा उत्स्फूर्त सहभाग








■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधत आरोग्य विषयी जनजागृतीच्या माध्यमातून आपले आरोग्य निरोगी राखावे व नागरिकांच्या मनातील एचआयव्ही आजारा बाबत असलेली भीती व गैरसमज दूर व्हावे या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभाग, आयएमए,महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण संस्था यांच्या वतीने जिल्हा सामान्य रुग्णालय येथून सायकल रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

सायकल रॅलीमध्ये जिल्हाधिकारी श्रीमती मीना जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी सहभाग नोंदवत ८ किलोमीटर रॅली पूर्ण केली. या उपक्रमात विद्यार्थी, युवक, डॉक्टर यांच्यासह विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.प्रारंभी एड्स जनजागृती शपथ घेण्यात आली.यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, आयएमए अकोला अध्यक्ष डॉ संतोषकुमार सोमणी,प्रकल्प प्रमुख डॉ.किशोर पाचकोर यांच्यासह सार्वजनिक आरोग्य विभाग व विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.सायकल रॅली ची सुरुवात जिल्हा सामान्य रुग्णालय मार्गे सरकारी बगीचा, माणिक टॉकीज रोड अग्रसेन चौक दुर्गा चौक हॉल रोड, नेहरू पार्क चौक फ्लायओव्हर वरुन पोलीस मुख्यालय निमवाडी सरकारी बगीचा मार्गे सामान्य रुग्णालय येथे समारोप करण्यात आला.

## थोडक्यात

### देवस्थान जमिनी वाचवण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाची वज्रमुठ

**तेल्हारा :** महाराष्ट्रातील देवस्थान इनाम जमिनी भूमाफियांनी हडपल्याच्या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघाने कठोर भूमिका घेतली आहे. मंदिरांच्या हजारो एकर जमिनींच्या संरक्षणासाठी गुजरात आणि कर्नाटकच्या धर्तीवर तात्काळ अँटी लँड ग्रॅबिंग (प्रतिबंध) कायदा लागू करण्याची मागणी महासंघाने केली आहे. भूमाफिया व त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी किमान १४ वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद असलेला अध्यादेश आगामी अधिवेशनाची वाट न पाहता, तात्काळ काढावा. हा कायदा दखलपात्र व अजामीनपात्रस्वरूपाचा असावा. राज्य पातळीवर उच्चपदस्थ पोलीस व महसूल अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन करून मागील २०-२५ वर्षातील सर्व जमीन हस्तांतरण प्रकरणांची सखोल चौकशी करावी. खरले सहा महिन्यांत निकाली काढण्यासाठी प्रत्येक विभागात विशेष न्यायालये स्थापन करावीत. कायद्याचा मसुदा बनवताना महाराष्ट्र मंदिर महासंघाला चर्चेत सहभागी करून घ्यावे. आदी मागण्यांचे निवेदन सादर केले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून अनेक भाविकांनी मंदिरांना जमिनी दान केल्या, मात्र भूमाफियांनी स्थानिक महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संगनमत करून इनाम वर्ग-३ च्याअहस्तांतरणीय जमिनी हडपल्या आहेत. इनाम रजिस्टरमध्ये बेकायदेशीर फेरफार करून किंवा महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमचे कलम ८८ डावलून जमिनी गिळंकृत करण्याचा सपाटा सुरू आहे. विदर्भात ५० कोटींची जमीन केवळ ९६० रुपयांना विकण्याचा असाच एक प्रकार महासंघाने उघडकीस आणला होता. उच्च व सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक मालमत्तेचे संरक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले असतानाही राज्यात सक्षम फौजदारी कायदा नसल्याने भूमाफियांना मोकळे रान मिळाले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन सभेच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन

अकोला : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन सभेच्या वतीने महानगरात सतराव्या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. दि ४ ते ६ डिसेंबर पर्यंत स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल सभागृहात नित्य सायंकाळी ६ वाजता हे व्याख्यान होणार आहे.

## पारंपरिक पिके सोडुन आधुनिक पिकांकडे शेतकऱ्यांचा कल

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी)

बबार्शिटाकळी तालुक्यात अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने संकटात सापडलेल्या चेलका येथील शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांकडे पाठ फिरवली.यावर्षी तालुक्यात कांदा सिडसब ,चिया सिडसब ची पेरणी भरपुर प्रमाणात आहे परंतु बार्शिटाकळी तालुक्यातील शेतकऱ्यांना कांदा पिकासाठी प्रधानमंत्री फसल विमा योजना लागु नाही ही योजना या तालुक्यासाठी सुरु करण्यात यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.मॉडेल व्हिलेज चेलका येथे दरवर्षी रब्बी हरभरा,गहु या पिकावर अवलंबून न राहता कांदा बिजोत्पादन पिकांकडे येथील शेतकऱ्यांनी सुरुवात केली. निसर्गरम्य वातावरण गावच्या चारही बाजूंनी भरपुर झाडं,पाणी भरपुर प्रमाणात आहे त्यामुळे येथील शेतकरी सोयाबीन,तुर, उन्हाळी तिळ अशी तिन पिकं घेतात काही शेतकरी सोयाबीन, हरभरा, उन्हाळी मुग अशी पिकं घेतली जातात.कपाशी काढुन गहु घेतला जातो त्यामुळे पिकांची फेरपालट होते.'बेला सिडसब नाशिक' कंपनीचे संचालक नंदकिशोर अहिरे यांनी चेलका येथील १३ शेतकऱ्यांना कांदा बिजोत्पादन साठी चांगल्या प्रतिचा कांदा उपलब्ध करून दिला.या पिकासाठी शेवटपर्यंत एका एकरसाठी अंदाजे साठ हजार खर्च येतो.यावर्षी खरीप कापुस, सोयाबीन,तुर पिकाचे नुकसान झाल्याने त्याची तुट कशी भरुन काढता येईल यासाठी येथील शेतकऱ्यांचे नेहमी प्रयत्न असतात. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने चेलका हे गाव दत्तक घेतल्याने कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ येथील शेतकऱ्यांना नेहमी मार्गदर्शन करतात त्याचाच एक भाग म्हणून डॉ.प्रकाश घाटोळ यांनी येथील शेतकऱ्यांना मसाला पिकं,कांदा सिडसब ,चिया सिडसब ,केळी,हळद, उन्हाळी तिळ अशी पिकं घेण्यासाठी सल्ला दिला.डॉ.प्रकाश घाटोळ चेलका येथे नेहमी येत असतात त्यामुळे येथील शेतकऱ्यांना ते जवळुन पाहतात शेतकऱ्यांना कोणत्या अडचणी येतात याकडे त्यांचे विशेष लक्ष असते.



**'ज्या शेतकऱ्यांनकडे पाणी उपलब्ध आहे अशा शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता आधुनिक पिकांकडे वळले पाहिजे त्यामध्ये चिया सिडसब, कांदा सिडसब,कमी खर्चामध्ये उन्हाळी तिळ अशी पिकं घेतली पाहिजे'.तसेच अकोला जिल्ह्यातील बाळापुर,पातुर आणि अकोट तालुक्यात कांदा पिकासाठी पिक विमा लागु आहे यामध्ये जिल्हा कृषी अधीक्षक अकोला यांनी बार्शिटाकळी तालुक्याचा समावेश करुन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.-रामेश्वर पाटील मॉडेल व्हिलेज चेलका**

## बालकांनी जागृत होऊन रंगवले बाल विवाह तथा हुंडा बळी होऊ न देण्याचे चित्र



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

महिला व बालविकास विभाग अकोला अंतर्गत मिशन शक्ती सखी वन स्टॉप सेंटर जिल्हा बाल संरक्षण कक्ष तसेच एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन अकोला. यांच्या संयुक्त विद्यमाने

१०० दिवसीय बाल विवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत आज वाढत असलेलेले बालविवाहाचे प्रमाण बघता बालकांमध्ये देखील जाणीव जागृती व्हावी या दृष्टीने चित्रकला स्पर्धा महिला व बाल विकास भवन येथे बाल स्नेही वातावरणात आयोजित केली गेली होती. सदर स्पर्धेचे विषय १) बालविवाह एक सामाजिक समस्या २) हुंडाबळी एक सामाजिक समस्या अशा प्रकारे होते या स्पर्धेत ४० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला आणि आपल्या कला गुणांना वाव देत खूप उत्कृष्ट पूर्ण निवडलेल्या विषयाची जाणीव देत चित्र रेखाटली बालकांना १०० दिवस बालविवाह मुक्त भारत या शासनाने निर्धारित केलेल्या संकल्पनेत सहभागी झाल्याचा आनंद आणि अभिमान बालकांनी रेखाटलेल्या चित्रात आढळून येत होता. सदर स्पर्धेच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन कैवल्य जैस्वाल यांनी तथा प्रस्ताविक ॲड मनिषा भोरे केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर तसेच आभार प्रदर्शन महेंद्र भगवान गणोदे अध्यक्ष एन्करेज एज्युकेशनल फाउंडेशन अकोला यांनी केले.

## अग्निशस्त्र पिस्टल व चार जिवंत काडतुस सह आरोपी अटकेत

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी)

हकीकत अशा प्रकारे की, काल दि २९/११/२०२५ रोजी संध्याकाळी पोलीस स्टेशन अकोट शहर येथील गुन्हे शोध तपास पथकाचे पोउपनि वैभव तायडे हे पोस्टे परिसरात डी बी पथकाचे अंमलदारासह नगर परिषद निवडणुक अनुषंगाने अकोट शहरात पेट्रोलींग करित असतांना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, रोहन मुरलीधर अंभोरे रा खानापूर वेस अकोट हा खानापूर वेस ते राजेंद्र नगर रोडवर देशी कट्टा (अग्नीशस्त्र) जवळ बाळगुन फिरत आहे अशा खात्रीलायक बातमी वरून तात्काळ पंच व पो स्टाफ सह सदर ठिकाणी जावुन सदर रोडवर संशयास्पद स्थितीत फिरणा-या इसमास पंचासमक्ष शिताफीने पकडुन त्याचे नाव गाव विचारून त्याचे अंगझडती घेतली असता त्याचे कमरेजवळ एक देशी कट्टा (अग्नीशस्त्र) व चार जिवंत काडतुस मिळुन आल्याने सदरबाबत त्यास शस्त्र परवाना आहे किंवा कसे याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ शस्त्र जवळ बाळगण्याबाबतचा कोणताही परवाना नसल्याने सदर देशी कट्टा व जिवंत काडतुस पंचासमक्ष जप्त करून आरोपी नामे रोहन मुरलीधर अंभोरे वय २० वर्ष रा राजेंद्र नगर खानापूर वेस अकोट जि. अकोला यास पोलीस स्टेशनला आणुन त्याचे विरुध्द अप नं. ४५४ / २०२५ कलम ३ / २५ भारतीय शस्त्र अधि. अन्वये दाखल करून तपासात घेतला.



## आज मनपात लोकशाही दिनाचे आयोजन

**अकोला :** शासनाच्या निर्देशानुसार तसेच मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिकेत सोमवार दि. १ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ ते ६ वाजेपर्यंत मनपा आयुक्त यांचे दालनात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. कृपया याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

## शहराचे तापमान १९.९ वरून १७.९ वर

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

शहरातील किमान तापमान कमी होत असून, थंडीची चाहूल लागल्याचे शुक्रवारी जाणवले. थंडी कमी होत असल्याचे गत आठवडाभरातील आकडेवारीवर नजर टाकल्यास दिसून येते. या मंगळवारी १९.९ वर पोहोचलेलेतापमान शुक्रवारी १७.९ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. जून महिन्यात १५५.८ मि.मी. पावसाची नोंद झाली. हा पाऊस सरासरीच्या ११३.८ टक्के होता. तसेच सप्टेंबर महिन्याच्या अखेर थेट वार्षिक सरासरी पेक्षा जास्त झाल्याची नोंद करण्यात आली. सरासरीपेक्षा जादा पाऊस पडल्याने भूजल पातळीत वाढ झाली.

गत आठवड्यात शहरात किमान तापमानात घटल्याचे सकाळी जाणवले होते. शहरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीच्या काही भागावर धुक्याची चादर होती.मात्र नंतरच्या काळात थंडी कमी झाली.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## सुचना-एसआरएम-७६

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६० मेगावॅट/आयटी/ टी-४९७/आरएफएक्स-३००००६३२३६ | कोराडी टीपीएस येथे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतील तृटी शोधणे, दुरुस्ती, इंस्टॉलेशन, अनइंस्टॉलेशन आणि कमिशनिंगचे काम. | रु. १८,४९८.५० / रु. १,४९९,८५०.०० |
| २ | २१० मेगावॅट/ओएस/ टी-४९८/आरएफएक्स-३००००६३६९२ | केटीपीएस, २१० मेगावॅट कोराडी येथे ८ सीटर इलेक्ट्रिक वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचे काम. | रु. ११,०००.०० / रु. ७५०,०००.०० |
| ३ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-४९९/आरएफएक्स-३००००६३७०९ | सीएचपी ३x६६० मेगावॅट, केटीपीएस कोराडी येथील कन्वेयर ५ए, ५बी आणि १३सी साठी एनोडाईज्ड वाईंडिंग ऑइल कूल्ड ओव्हरबँड मॅग्नेटिक सेपरेटर आणि कंट्रोल पॅनलचा पुरवठा व प्रतिष्ठापन. | रु. १६४,२१०.०० / रु. १६,०७१,०००.०० |
| ४ | २१० मेगावॅट/सीएचपी/ टी-५००/आरएफएक्स-३००००६३४७८ | सीएचपी-२१० मेगावॅट, केटीपीएस कोराडी येथे प्रतिष्ठापीत केलेल्या टनेल डीवॉटरिंग व संलग्न डीवॉटरिंग पंपांच्या कामांसाठी दोन वर्षांचा कंत्राट. | रु. ५४,३५१.७३ / रु. ५,०८५,१७२.७० |
| ५ | २१० मेगावॅट/सीएचपी/ टी-५०१/आरएफएक्स-३००००६३६२५ | २१० मेगावॅट/६६० मेगावॅट सीएचपी येथे लोको ऑपरेटर सेवा पुरविण्याचा कंत्राट. | रु. ३१,७११.८० / रु. २,८२१,१७९.९० |
| ६ | ६६० मेगावॅट/एमपीडी/ टी-५०२/आरएफएक्स-३००००६३४१५ | केटीपीएस कोराडी येथे दैनंदिन कामांसाठी एचटी फास्टनर्सची खरेदी. | रु. १९,४४८.१० / रु. १,५९४,८१०.०० |
| ७ | ६६० मेगावॅट/टीएम/ टी-५०३/आरएफएक्स-३००००६३५५० | ३x६६० मेगावॅट केटीपीएस कोराडी युनिट्समधील ईटीपी क्षेत्रातील क्लिअर वॉटर पंप हाऊससाठी कम्प्लीट व्हर्टिकल सबमर्ज्ड पंप असेंब्लीचा पुरवठा. | रु. १५,७००.०० / रु. १,२२०,०००.०० |
| ८ | ६६० मेगावॅट/सीएचपी/ टी-५०४/आरएफएक्स-३००००६३२३० | सीएचपी-व्हीएम ३x६६० मेगावॅट, केटीपीएस कोराडी येथे लोकोमोटिव्हसाठी कमिन्स स्पेअर्सची खरेदी. | रु. १२,४५८.१४ / रु. ८९५,८१४.१३ |

ई-टेंडरिंगसाठी बोलिदात्यांना त्यांच्या फर्मची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
अधिक माहितीसाठी संपर्क: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: +९१-८४११९५८६२२
ई-मेल आयडी : eepurchasekoradi@mahagenco.in

हस्ता/-
मुख्य अभियंता,(सं. व सु.)
महानिर्मिती, केटीपीएस, कोराडी

## बाबूजी देशमुख वाचनालय वक्तृत्व स्पर्धेत प्रभातची कु.आनंदी मोडक प्रथम क्रमांकाची मानकरी

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी)

बाबूजी देशमुख वाचनालयाचे वतीने महात्मा फुले पुण्यतिथी निमित्त शालेय विद्यार्थ्यांकरता ' महात्मा फुले जीवन आणि कार्य ' या विषयावर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत प्रभात किड्स स्कूल रनिंग ट्रॉफी ची मानकरी ठरली.प्रभात ची कु.आनंदी राजेश मोडक ही प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. द्वितीय क्रमांक- गौसिया अंजुम जाकीर खान (मुस्लिम उर्दू हायस्कूल जुने शहर अकोला), तृतीय क्रमांक - कु. जीगिशा विशाल काटोले(कोठारी कॉन्व्हेंट अकोला). बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार, सचिव अनुराग मिश्रा यांचे हस्ते प्रभात किड्स स्कुलला महात्मा फुले फिरती ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. विजेत्या स्पर्धकास स्मृतीचिन्ह व बक्षिस देवून सन्मान करण्यात आला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. विवेक हिवरे, एम.पी. मिश्रा व प्रा. बबनराव कानकिरड यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. मोहन खडसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी ग्रंथपाल सुरेश टेके, सतिश उगवाल, जुगलकिशोर शिरसाट,नितीन कदम, स्वप्निल ताथोड, अनिल मिश्रा यांनी अथक परिशम घेतले.



### ई झोन एसआयपी अॅबॅकस विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्पर्धेत यश

**अकोला :** चेन्नईत झालेल्या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्पर्धेत स्थानिक ई झोन एसआयपी अबॅकसच्या ३२ पैकी तब्बल २९ विद्यार्थ्यांनी विजेतेपद मिळवत चमकदार कामगिरी केली. यामध्ये विजेते विद्यार्थी आदित्य गुप्ता, अमृता सुरे, हिरण्य तायडे, चिन्मय सावजी, गौरव आणि विराट तायडे, नमन पनपलिया, हृदय देवळे, आराध्या सरोदे, आदिनी अभिनंदन केले.

## जिल्ह्यातील ११ वाळूघाटांच्या ई– लिलावाला तिसऱ्यांदा मुदतवाढ

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील १५ वाळू घाटांचा लिलाव यापूर्वीच जाहीर करण्यात आला आहे. त्यापैकी ११ घाटांच्या लिलावाला तिस–यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई–लिलावाच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून, शुद्धीपत्रक निर्मगित करण्यात आले आहे. सुधारित कार्यक्रमानुसार ई– निविदा ऑनलाईन स्वीकारण्याची मुदत दि. ९ डिसेंबर रोजी दु. २ वा. पर्यंत वाढविण्यात आली आहे. ई–निविदा (तांत्रिक लिफाफा) उघडणे, तांत्रिक पडताळणी, आर्थिक लिफाफा उघडणे आदी प्रक्रिया सुधारित वेळापत्रकानुसार दि. १० डिसेंबर रोजी करण्यात येईल. ई– लिलाव प्रक्रिया (ई–ऑक्शन) दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. पासून दु. १ वा. पर्यंत पूर्ण करण्यात येईल. अधिकाधिक लिलावधारकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सुधारित वेळापत्रक शासनाच्या महाटेंडर्स, तसेच जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

एकूण ११ वाळूघाट

अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, कट्यार, म्हैसांग व उगवा या घाटांचा समावेश आहे. बाळापूर तालुक्यातील निंबी, बहादुरा, सागद, नागद, डोंगरगाव, मांजरी या घाटांचा समावेश आहे.

## नगर परिषद/नगरपंचायत निवडणुका; अकोला पोलीस दल सज्ज

### मतदान, मतमोजणी आणि संपूर्ण जिल्ह्यात कडक सुरक्षा व्यवस्था

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :** अकोला जिल्ह्यातील ५ नगर परिषद व १ नगरपंचायत निवडणुका दि. ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडत असून ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. सन २०१६ नंतर तब्बल ९ वर्षांनी या निवडणुका होत असल्या मुळे राजकीय वातावरण तापले असून सर्व प्रमुख पक्षांत तीव्र स्पर्धा आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुका शांत, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अकोला जिल्हा पोलीस दल पूर्णपणे सज्ज असून मागील एक महिन्यापासून व्यापक पातळीवरील तयारी सुरु आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोग व शासनाकडून मिळालेल्या सूचनांनुसार पोलीस अधीक्षक, अकोला यांनी जिल्हाधिकारींसह संयुक्त भेटी देत स्ट्राँगरूमची पाहणी, सुरक्षा मूल्यांकन आणि बंदोबस्त आराखड्यावर पुनरावलोकन केले. ईव्हीएम सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना राबविण्याच्या सक्त सूचना करण्यात आल्या. जिल्ह्यातील संवेदनशील भाग, मिश्र वस्ती, पूर्वी जातीय वाद घडलेली क्षेत्रे तसेच बहुबुथ इमारती याठिकाणी पोलीस उपाययोजना अधिक कडक करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व डउ्झज व झडज यांनी स्वतः सर्व मतदान केंद्रांची पाहणी करून बंदोबस्ताची पडताळणी केली असून मतदान व मतमोजणी दोन्ही शांततेत पार पडतील याची खात्री केली आहे.

अकोला जिल्ह्यातील नगर परिषद/ नगरपंचायत निवडणूक आकडेवारी एकूण नगरपरिषद/नगरपंचायत: ६ एकूण मतदान केंद्रे (झड): २४७ एकूण इमारती (झडङ): १०० नगरसेवक पदांसाठी उमेदवार: ६८० नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार: ३८SST-FST-VST बंदोबस्त एकूण १८ डडढ लोकेशन्स तयार करण्यात आले असून या टीमसाठी ११८ पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.पूर्वी नगरपरिषद/मनपा/ जिल्हा परिषद निवडणुकांमधील एकूण ६९ गुन्ह्यांतील ११० आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. १ ऑक्टोबर ते २८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत : कलम १०७/११६(३) अंतर्गत: ९९५ कारवाया इझ अलीं ५५: ०२, इझ अलीं ५६: २५, चझऊअ: ०३, इछडड: ०१अवैध दारूविरोधात ३४२ मुद्देमाल नष्ट करीत रु. ३७,१६,१०५ किंमतीचा माल जप्त व नष्ट करण्यात आला.आर्म्स ॲक्टअंतर्गत ०७ गुन्हे नोंदवून तलवार व सुरे अशी शस्त्रे जप्त केली.

मतदान व मतमोजणीसाठी पोलीस बंदोबस्तजिल्ह्यात खालील मनुष्यबळ तैनात : अववश्र डझ – ०१, SDPO – ०४, PI – २२, API/PS>I – ११६, पोलीस कर्मचारी – २३००, होमगार्ड – ६००, डठझक्र – १ कंपनी. संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस, डठझक्र, ठउझ सेक्शन्स तैनात केली जाणार आहेत.एकूण २४७ मतदान केंद्रांपैकी १२४ संवेदनशील म्हणून वर्गीकृत. प्रत्येक सेक्टरवर १ अधिकारी + ५ पोलीस कर्मचारी + ५ होमगार्ड अशी सेक्टर पेट्रोलिंग ठेवण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनमधून १ अधिकारी व १० कर्मचारी रिझर्व ठेवले जातील.मतदान आणि मतमोजणी दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अकोला जिल्हा पोलीस दलाने स्थानिक पोलीस व बाहेरील तुकड्यांसह संयुक्त रूट मार्चेस सुरु केले

## लाचखोर वरिष्ठ लिपिक ममता पाटील यांना पोलिस कोठडी!

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :** एका प्रकरणात कारवाई करण्यासाठी वरिष्ठांना अहवाल सादर करण्यासाठी अकोला पोलिस अधीक्षक कार्यालयातील आस्थापना विभागातील वरिष्ठ लिपिक ममता संजय पाटील या महिलेने तक्रारदार यांना २० हजार लाचेची मागणी केली. ८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्यांना अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अकोला पोलिस अधीक्षक कार्यालयात रंगेहात अटक केली. आरोपी पाटील यांनान्यायालयात हजर केले असता त्यांना एक दिवसाची पोलिस कोठडी मिळाली आहे.ममता संजय पाटील (५०) वरिष्ठ लिपिक, आस्थापना विभाग, पोलिस अधीक्षक, कार्यालय अकोला ह.मु. गीता नगर, तीन बंगलाजवळ, अकोला, मूळ पत्ता वृंदावन नगर, चिखली रोड, बुलढाणा असे अटक केलेल्या लोकसेवक महिलेचे नाव आहे. थोडक्यात हकिकत अशी की, यातील तक्रारदार हे धान्य खरेदी–विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्याकडे कमिशन बेसवर काम करणारा कैलास ओमप्रकाश अग्रवाल यांनी ऑक्टोबर २०२३ मध्ये तक्रारदार यांच्या अनुमतीशिवाय त्यांच्या वेअर हाऊसमधील धान्य विकून तक्रारदाराची फसवणूक केली. त्यावरून रामदासपेठ, पोलिस स्टेशन येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलिस स्टेशन रामदासपेठ तसेच गुन्हे शाखा अकोला यांच्याकडे आहे.

## हिंद –दी – चादर श्री गुरु तेगबहादुर साहीब ३५०वा शहीद शताब्दी मिलन कार्यक्रमांतर्गत शहरात जागरण रथाचे स्वागत



**▪तेल्हारा,दि ३० (प्रतिनिधी)** महाराष्ट्र सरकारच्या अल्पसंख्यांक विभाग व राज्यस्तरीय समन्वय समिती द्वारा आयोजित हिंद–दी –चादर श्री गुरुतेक बहादूर साहेब यांचा ३५० वा शहिदी शताब्दी मिलन समारोह नागपूर येथील सुरेशचंद्र सूरी ग्राउंड सर्वे.नंबर १६८ जरीपटका पोलीस स्टेशन रोड नारा येथे आगामी ७डिसेंबर २०२५ रोजी सकाळी नऊ ते १० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला असून सदर समारंभाच्या जागृती करिता नागपूरवरून निघालेला जागरण रथाचे तेल्हारा शहरात शुक्रवारी दि.२८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजता जल्लोषात स्वागत करण्यात आले. अग्रसेन टॉवर चौकात तेल्हारा नगर संघचालक गजाननराव मुंजे यांच्या प्रमुख उपस्थिती जनजागरण करण्यात आले.

हिंद–दी –चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब यांचे ३५० वी शहीद शताब्दी समागम गुरु तेगबहादूर साहिब यांचे बलिदान संपूर्ण मानवता व धार्मिक स्वतंत्रता आणि सत्यासाठी होती.या पवित्रक्षणी सिख, शिकली,घरालबाणा, बंजारा,मोहयाल, सिंधी आणि गुरुनानक नाव घेणारे संगत समाजाने एकजूट होऊन या शहीद मिलनाचा समारोह साजरा करण्याची योजले आहे. ज्यांनी शेकडो वर्षांपूर्वी एकता सहस आणि मानवतेचा संदेश दिला. हा मिलन समारंभ फक्त श्रद्धांजली नाही तर गुरु साहेब यांची शिक्षा आणि ती गवाही च्या भावनेला येणाऱ्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे असे यावेळी,प्रस्ताविकातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तेल्हारा नगर सहकार्यवाह विद्याधर खुमकर यांनी उद्बोधनातून सांगितले. जागरण प्रचार रथासमवेत उपस्थित असलेले नागपूर येथील सचिन गुजर अकोट तालुका प्रचारक प्रमुख व धर्म जागरण विभाग अकोट ग्रामीण प्रमुख गजानन अवचार, तेल्हारा संघाचालक गजानन मुजे यांच्या सह दीपक पुडकर,सुरेश शिंगणारे, फकीरचंद भट्टड ऋषिकेश नळकांडे,सचिन गावत्रे शिवराज जामोदे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

## विशेष रेल्वे गाड्यांच्या फेऱ्यांचा विस्तार



**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी)** प्रवाशांच्या सुविधेसाठी व वाढत्या प्रवास मागणीची पूर्तता करण्याच्या उद्देशाने रेल्वेद्वारे विशेष गाड्यांच्या फेऱ्यांचा विस्तार करण्यात आला आहे. या गाड्यात आता २५ डिसेंबर ते २ जानेवारीपर्यंत धावणार आहेत. काही दिवसांपासन मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातर्फे प्रवाशांसाठी उत्सवाच्या निमित्ताने विशेष गाड्यांची घोषणा केली होती. यात राजकोट– महबूबनगर आणि ओखा– मदुराई या मार्गांदरम्यान विशेष भाड्याने उत्सव विशेष गाड्या चालावण्याचा निर्णय घेतला होता. आता यासह अन्य गाड्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

## टिळक राष्ट्रीय विद्यालयात आबासाहेब कुलकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

### शाळेच्या सर्वांगीण विकासाचा माजी विद्यार्थी संघाचा निर्धार

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी)** स्वातंत्र्यपूर्व काळापासून क्रांतीकारक घडविणारी उमरी येथील टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर अर्थात टिळक राष्ट्रीय शाळेमध्ये शनिवारी शाळेचे आद्य संस्थापक परम पूज्य स्व. पुरुषोत्तम उर्फ आबासाहेब धोंडू कुलकर्णी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. पुण्यतिथी निमित्त आबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांसह मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती.

शासकीय तथा खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करावेत या शासकीय परिपत्रकानुसार टिळक राष्ट्रीय शाळेतही माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली आहे. या माजी विद्यार्थी संघाने शनिवारच्या कार्यक्रमासाठी विशेष पुढाकार घेतला. जवळपास ३०० माजी विद्यार्थी या समारंभाला हजर राहिले. अतिशय ख्याती प्राप्त अशा टिळक राष्ट्रीय शाळेला गतवैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार या समारंभाच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.



शाळेमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, व्यायामशाळा, स्वच्छ परिसर असावा व त्यासाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे करावा असे आवाहन या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आले. सर्वांनी सहकार्य केले तर ही बाब कठीण नसल्याचे मत याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री. दिगंबर वनारे,श्री. उमेश मसने, श्री.प्रकाश मालगन, श्री किरण सावके, श्री संतोष गावंडे, श्री नितीन वर्गे, श्री तुषार काळमेघ, श्री. शिलरत्न वानखडे,श्री. सुनील मातुलकर,श्री.संजय पळसपगार, श्री.विठ्ठल थोटे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका, माजी विद्यार्थी यांच्यासह विद्यार्थ्यांची, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. संजय मोटे यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश मसने यांनी केले.

## अंमलपदार्थ (गांजा) करणाऱ्या इसमावर धडक कार्यवाही

अकोला : दिनांक ३०/११/२०२५ रोजी पोलीस स्टेशनला हजर असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाली की, ग्राम मुंडगाव ता. अकोट, जि अकोला येथील एक इसम नामे संतोष जयस्वाल हा त्यांचे घरामध्ये गांजा (अमली पदार्थ) आणुन विक्री करीता ठेवलेला आहे. अशी खबर मिळाल्याने सदरची बातमी मा. पोलीस अधीक्षक साहेब, अकोला यांना देवुन त्यांचे परवानगी घेवुन गांजा विक्री करणारा इसमांचे घरी ग्राम मुंडगाव ता. अकोट येथे पंच, पोस्टाफ, वजनकाटयावाला, फोटोग्राफर यांचेसह जावुन छापा कार्यावाही केली असता. आरोपी नामे संतोष रमेशलाल जयस्वाल, वय ५३ वर्ष, रा. मुंडगाव, ता. अकोट, जि. अकोला यांचेजवळुन पांढ–या रंगाच्या प्लॉस्टीक पिशवीमध्ये गांजाचे पान फुले व बियाणे एकूण वजन १५९४ ग्रॅम किं. अं. ३७,५००/– रू चे मिळुण आल्याने आरोपीविरूदध गुन्हा दाखल करून आरोपीस सदर गुन्हयात अटक करण्यात आली. पुढील तपास अकोट ग्रामीण पोलीस करीत आहेत.



## रस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य; नियोजन कोलमडले

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी)** हिवाळा सुरू झाल्याने दिवस लहान झाला असून, रात्र मोठी झाली आहे. ही बाब लक्षात घेता अकोला महापालिकेच्या विद्युत विभागाने पथदिवे सुरू करण्याचे वेळापत्रक बदलणे अपेक्षित होते. मात्र, विभागाने याकडे सपशेल दुर्लक्ष केल्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. हीच समस्या राष्ट्रीय महामार्गावरही दिसून येत आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर पथदिवे सुरू करण्यासाठी काही ठिकाणी टायमर लावण्यात आले आहेत. हिवाळ्यात सूर्य लवकर मावळत असल्याने या टायमरची वेळ बदलणे अत्यावश्यक असताना, विद्युत विभागाने या नियोजनाकडे कानाडोळाकेला आहे.

सायंकाळी ६ वाजेनंतर मुख्य रस्त्यांवर वाहतुकीची मोठी वदर्ळ सुरू होते. नागरिकांची आणि वाहनांची ये–जा सुरू असतानाच, वेळेत दिवे सुरू न झाल्याने मुख्य रस्ते अंधारात बुडालेले असतात. शनिवारी सायंकाळी मुख्य डाकघर ते सिव्हिल लाईन या वदर्ळीच्या मार्गावरील पथदिवे बंद होते. विद्युत विभागाच्या या नियोजनशून्यतेमुळे नागरिकांमध्येनाराजीचे वातावरण आहे. अंधारामुळे वदर्ळीच्या रस्त्यांवर लहान–मोठे अपघात होण्याची शक्यता वाढली असून तातडीने पथदिवे सुरू करण्याची वेळ बदलून रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश उपलब्ध करण्याची मागणी होत आहे.

## ज्ञानेश्वरी हे भगवतगीताचे सोपे रूप–डॉ धनश्री लेले

### काकासाहेब ठोंबरे सार्वजनिक वाचनालया च्या व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी)** भगवद्गीतेत भगवंतांनी मानवाला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी कर्मयोगाचे तळवीज केली वास्तविक कर्मयोग हा भगवद्गीतेच्या आधी पण होता ही भगवद्गीता सामान्य जणांना सुलभ व सोप्या पद्धतीने आकलनासाठी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी परिवर्तित केली कर्मयोग म्हटलं की भगवद्गीता आठवते ज्ञानेश्वरींनी भगवद्गीतेचे भाषांतर न करता ते सोपे केले सहज केले हेच ज्ञानोबारायांचे सर्वात मोठे महान कार्य आहे भगवद्गीता हे ज्ञानेश्वरांनी जशीच्या तसे भाषांतर न करता ती फुलविली जनसामान्यांच्या आकलनाच्या दृष्टीने ती बहरवली तसेच त्यातील कर्मयोग हा सुद्धा सहज सोप्या पद्धतीने मांडून मोठे महत्त्व कार्य केले असल्याचे प्रतिपादन पुणे येथील आध्यात्मिक तज्ज्ञ डॉ धनश्री लेले यांनी केले.स्थानिक कै. काकासाहेब ठोंबरे स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जठारपेठ रोडवरील रा.तो.आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित दोन दिवसीय व्याख्यान मालेत डॉ धनश्री लेले यांनी ज्ञानेश्वरीतील कर्मयोग या विषयावर व्याख्यान सादर केले.ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अविनाश देव यांच्या





अध्यक्षतेत व काकासाहेब ठोंबरे सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष डॉ किशोर पिंपरकर यांच्या उपस्थितीत संपन्न या व्याख्यानात डॉ लेले पुढे म्हणाल्या, भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायात कर्मयोगाची सुरुवात होते. आपल्या जीवनातील गरजेचे सर्व विषय या कर्मयोगात अंतर्भूत आहेत. पहिल्या अध्यायात केवळ अर्जुन बोलत असतात, तर दुसऱ्या अध्यायात भगवान कृष्ण सांगायला लागतात.याचा अर्थ असा की प्रथम ऐकावे नंतर बोलावे, ही म्हण या माध्यमातून दिसून येत असल्याचे डॉ लेले यांनी यावेळी सांगितले. कर्मयोगात भगवान कृष्णांनी आत्म्याचे अविनाशी व अमर तत्त्व सांगितले. त्यांनी 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन–'हा कर्म करून फळाची अपेक्षा न बाळगण्याचे सूत्र सांगितले. त्यांनी या मर्माची स्थिती सांगून ब्राह्मी स्थिती पण अवगत केली.मात्र अर्जुनाची युद्धाच्या संदर्भातील गोंधळलेली स्थिती हे गीतेला अवतारित होण्यासाठी पोषक ठरली असल्याचे डॉ लेले यांनी यावेळी सांगितले. त्या म्हणाल्या,जेव्हा कर्तव्यशील कर्म करायचे असते तेव्हा नाना तऱ्हेच्या सबबी देण्यात येतात. आपल्या कर्तव्याला आपण कुठेतरी चुकत असतो.अशीच तऱ्हा अर्जुनाच्या संदर्भात युद्धजन्य परिस्थितीच्या वेळेस झाली असल्याचे डॉ लेले यांनी यावेळी सांगितले. अशा भावस्थितीचे सुयोग्य व सुरेख वर्णन ज्ञानोबांनी कर्मयोगाच्या संदर्भात ज्ञानेश्वरीत विशद केले असल्याचे त्यांनी सांगितले. त्या म्हणाल्या महाभारतातील एक छोटा भाग म्हणून ही गीता आहे. त्या गीतेतील चार श्लोकात कर्मयोग मांडण्यात आला आहे.पण त्याची व्याप्ती इतकी खोल आहे की या गीतेतील ती प्राण झाली आहे. यात कृष्ण हे प्रत्यक्ष उत्तर देत नाहीत,तसेच अर्जुनाची संपूर्ण समज झाल्या पर्यंत त्यांना ते आपल्या कर्तव्याची कर्मयोगाच्या माध्यमातून जाणीव करून देत असल्याचे सांगितले.

## श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागममध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

### मानवता रक्षणासाठी श्री.गुरू तेग बहादूर यांचे बलिदान प्रत्येकाला प्रेरणा

**▪अकोला,दि ३० (प्रतिनिधी)** 'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. जानेवारीमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे.तर ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागमचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राज्यस्तरीय समितीच्या वतीने करण्यात आहे. राज्य समिती,स्थानिक समिती व समाजबांधवांच्या उपस्थितीत बैठक नियोजनभवनात झाली.

यावेळी राज्य समितीचे किसनराव राठोड, महंत जितेंद्र महाराज,महंत सुनील महाराज यांच्यासह नंदू पवार अभिमान महाराज, गुरुमितसिंग गोसल,सुरजीतसिंग अकाली, लताताई राठोड,प्रकाश गोगलिया,हरीश पारवानी, सदाशिव चव्हाण आदी उपस्थित होते.श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत.मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी कार्य करताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षा निमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरू तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने ७ डिसेंबर रोजी नागपूर,२१ डिसेंबर रोजी नवी मुंबई तर जानेवारीमध्ये नांदेड कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री गुरू तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचविण्यात येणार आहे.तहसील, शहर जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात श्री गुरू तेग बहादूर यांच्या हौतात्म्याचा इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा.या गौरवशाली इतिहासाच्या स्मृती सोहळ्यानिमित्त शीख, सिकलीगर, बंजारा,लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे गुरुबंधुत्व नाते अधिक दृढ होणार आहे.

श्री गुरू तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतीक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव करण्यात येणार आहे.या कार्यक्रमामुळे गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरुबंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१–८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# कॅलिडोस्कोप



## जावयांचं गाव

लग्नानंतर मुलगी सासरी जाते. जगाची हीच रित आहे. काही भाग मातृसत्ताक आहेत. पण सर्वसाधारणपणे मुलींनाच आपलं घर सोडून परक्या घराला आपलंसं करावं लागतं. मात्र उत्तर प्रदेशातलं एक गाव अनोखं आहे. हे गाव जावयांचं शहर म्हणून ओळखलं जातं. या गावातल्या मुली सासरी जात नाही तर मुलंच आपल्या सासरी नांदायला येतात. उत्तर प्रदेशमधल्या कौशांबी जिल्ह्यातल्या हिंगुलपूर गावची ही कहाणी आहे. हिंगुलपुरला दामादों का पुरवा म्हणजेच जावयांचं गाव म्हणूनही ओळखलं जातं. मात्र ही या गावची परंपरा नाही. काही वर्षांपूर्वीपर्यंत हे गाव स्त्रीभ्रूणहत्या तसंच महिलांवरील अत्याचारांसाठी कुप्रसिद्ध होतं. मात्र नंतर इथल्या लोकांनी हे प्रकार थांबवण्यासाठी पुढाकार घेतला आणि नवा पायंडा पाडला. आपल्या मुलींना सासरी पाठवण्याऐवजी त्यांच्या नवऱ्यांनाच घरी आणण्याचा निर्णय घेतला. या निर्णयात गावातल्या ज्येष्ठांचा मोठा वाटा होता. या गावातल्या सर्व समुदायातल्या लोकांनी या प्रथेला मान्यता दिली आहे. मुलींच्या लग्नाची बोलणी करताना घरजावई होण्याची अट ठेवली जाते. मगच पुढचे निर्णय घेण्यात येतात. गावात येणाऱ्या जावयांच्या रोजगाराची सोयही करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशमधल्या विविध शहरांमधली मुलं या गावात जावई म्हणून नांदत आहेत. एकाच घरात जावयांच्या पिढ्या वसल्या आहेत.

## जगातील सर्वांत उंच एअरबेस



भारताने हवाई क्षेत्रात लक्षवेधी भरारी घेतली आहे. पूर्व लडाखमधील चांगथांग न्योमा (मुध) एअरबेस, १३ हजार सातशे फूट उंचीवर असलेला जगातील सर्वात उंच एअरबेस आता पूर्णपणे कार्यरत झाला आहे. तो भारताच्या हिमालयीन सीमेला बळकटी देणार आहे. भारताच्या या कामगिरीमुळे चीन आणि पाकिस्तानची झोप उडाली आहे.

पूर्व लडाखच्या चांगथांग प्रदेशात सिंधू नदीच्या खोऱ्याजवळ स्थित, 'न्यिमा ॲडव्हान्स्ड लँडिंग ग्राउंड' (एएलजी) १३ हजार सातशे फूट उंचीवर आहे. सर्व लढाऊ विमानांसाठी हे जगातील सर्वात उंच हवाई तळ ठरले आहे. लेह शहराच्या आग्नेयेस सुमारे १६० किलोमीटर अंतरावर, पँगोंग त्सो तलावाच्या दक्षिणेस आणि काराकोरम पर्वतरांगाच्या पूर्वेस, चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ ते आहे. ते भारताच्या उंचावरील हवाई ऑपरेशन्सला बळकटी देते. त्यामुळे सीमा तणावादरम्यान जलद उड्डाणे शक्य होतात.

अहवालानुसार, हे विमानतळ पहिल्यांदा १९६२ मध्ये बांधण्यात आले होते. २००९ मध्ये भारतीय हवाई दलाने वाहतूक विमानांच्या ऑपरेशन्ससाठी ते पुन्हा सक्रिय होईपर्यंत ते वापरात नव्हते. त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये, चंदीगडहून उड्डाण करणाऱ्या क्रमांक ४८ स्क्वॉड्रनच्या एएन-३२ टॅक्टिकल ट्रान्सपोर्टरने चाचणी लँडिंग केले. न्योमाच्या वापरामुळे या कठीण प्रदेशात सैन्याच्या लॉजिस्टिक सपोर्टमध्ये वाढ झाली आहे. हेलिकॉप्टर व्यतिरिक्त, एएन-३२ आणि सी-१३० सुपर हरक्यूलिस नियमितपणे न्योमा येथून सैन्याची वाहतूक करण्यासाठी आणि पुरवठा आणि उपकरणे आणण्यासाठी उड्डाण करतात. नेव्हिगेशन आणि सपोर्ट सुविधा अजूनही प्राथमिक आहेत.

२०२० मध्ये चीनच्या 'पीपल्स लिबरेशन आर्मी'सोबत झालेल्या गलवान व्हॅली संघर्षानंतर केंद्र सरकारने हवाई पट्टीचे पूर्ण एअरबेसमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. हा प्रकल्प २०२१ मध्ये 'बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन' (बीआरओ) च्या 'प्रोजेक्ट हिमांक'ने सुमारे २२० कोटी खर्चून सुरू केला होता. या प्रकल्पात ३ किलोमीटर लांबीची पक्की धावपट्टी, हवाई वाहतूक नियंत्रण संकुल, सुरक्षा हँगर्स आणि ब्लास्ट पेन आणि इतर प्रशासकीय आणि सहाय्यक पायाभूत सुविधांचा समावेश आहे. यामुळे अमेरिकन सी-१७ आणि रशियन आयएल-७६ सारख्या धोरणात्मक विमानवाहू विमानांना नियमित ऑपरेशन्सदेखील करता येतील. त्यामुळे सैन्याची जलद तैनाती तसेच टँक, रॉकेट, हवाई संरक्षण प्रणाली आणि तोफखाना यासारख्या जड उपकरणांना परवानगी मिळेल. संरक्षणतज्ज्ञांच्या मते, कोणत्याही ऑपरेशनला सुरुवात करण्यासाठी ते वेग आणि आश्चर्याचा घटक देखील प्रदान करते.

वाहतूक विमाने आणि हेलिकॉप्टर व्यतिरिक्त, विविध लढाऊ स्क्वॉड्रनच्या तुकड्या देखील न्योमा येथे रोटेशनवर तैनात असण्याची अपेक्षा आहे. संघर्षानंतर लडाखमध्ये तैनात केलेली मानवरहित हवाई वाहने आणि अपाचे सारखे हल्ला करणारे हेलिकॉप्टरदेखील या तळावरून नियमितपणे उड्डाण करू शकतात. न्योमा येथे हवाई मालमत्तेची कायमस्वरूपी तैनाती, चीनविरुद्ध प्रतिबंधक म्हणून काम करण्याव्यतिरिक्त, वास्तविक नियंत्रण रेषेवर देखरेख आणि गुप्तचर माहिती गोळा करण्याच्या कार्यांनादेखील चालना देईल. सध्या सुमारे दहा हजार फूट उंचीवर असलेले लेह आणि थोइस हे लडाखमध्ये लढाऊ कारवायांसाठी सक्षम असलेले एकमेव हवाई क्षेत्र आहेत.

## गूढ भाषा बोलणारं गाव

आपल्या भारत देशात अनेक भाषा बोलल्या जातात. आपल्याकडे बोलीभाषाही आहेत. प्रत्येक दोन मैलांवर भाषा बदलते असं म्हणतात. हिंदी आपली राष्ट्रभाषा. त्यासोबतच प्रत्येक राज्याची राज्यभाषा आहेच. गावांमध्ये भाषेचा लहेजा बदलतो. हिमाचल प्रदेशमधल्या एका गावात गूढ भाषा बोलली जाते. ही भाषा फक्त याच गावातल्या लोकांना येते. दुसऱ्या कोणलाही ती शिकवली जात नाही. हिमाचल प्रदेशसारख्या सुंदर राज्यातल्या मलाणा गावातले लोक ही भाषा बोलतात. १७०० लोकवस्ती असणाऱ्या या गावात पर्यटकही येतात. मलाणा गावाची वाट फारशी सोपी नाही. इथे जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. डोंगराळ रस्त्यातून वाट काढतच इथे जावं लागतं. इथले लोक स्वत:ला सिकंदराचे वंशज मानतात. सिकंदराने भारतावर हल्ला केल्यानंतर त्याचे काही सैनिक याच गावात




राहिल्याचं सांगितलं जातं. सिकंदराच्या काळातली एक तलवार गावातल्या मंदिरात ठेवल्याचंही बोललं जातं. इथले लोक कनाशी भाषा बोलतात. इथल्या लोकांच्या मते कनाशी ही अत्यंत पवित्र अशी भाषा आहे. या भाषेच्या उगमाबाबत संशोधन सुरू असलं तरी अद्याप काही हाती लागलेलं नाही. या गावातली ज्येष्ठ मंडळी बाहेरच्या लोकांशी हस्तांदोलनही करत नाहीत. इथले दुकानदार वस्तू तसंच पैसे बाहेरच्या ग्राहकांच्या हातात देत नाहीत.मात्र गावातली नवी पिढी या सगळ्या गोष्टी मानत नाही. त्यांनी नव्या गोष्टी अंगिकारल्या आहेत. इथले लोक लग्नही भावकीतच करतात. गावाबाहेरून कोणी मुलगी लग्न करून इथे येऊ शकत नाही. समाजाबाहेर लग्न करणाऱ्या व्यक्तीला बेदखल केलं जातं. मात्र आजवर अशी घटना घडलेली नाही.

## येथे मिळते फक्त शाकाहारी जेवण!




गुजरातच्या भावनगर जिल्ह्यातील पालिताना शहरात आता मटण, चिकन, अंडी, मच्छीसह सर्व प्रकारच्या मांसाहारावर बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयानंतर फक्त शुद्ध शाकाहारी जेवण मिळणारे पालिताना हे जगातील पहिले शहर ठरले आहे. जैन साधूंनी केलेल्या दीर्घ आंदोलनानंतर हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून देशभरात या निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे.

पालिताना हे जैन धर्मीयांसाठी अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते. शहरातील शंत्रुजय पर्वतावर ९०० हून अधिक संगमरवरी मंदिरे आहेत. त्यामुळे हे जगातील एक अनोखे धार्मिक स्थळ मानले जाते. गुजरातची आर्थिक राजधानी अहमदाबादपासून सुमारे २०० किलोमीटर अंतरावर असलेले पालिताना हे जैन धर्मीयांचे अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. येथे मांसाहार बंद करण्यासाठी २०१४ मध्ये सुमारे २०० साधूंनी उपोषण केले होते. त्या वेळी शहरातील मटण-चिकन, अंड्यांची दुकाने बंद करण्याची मागणी जोरात होती. त्यानंतरही सातत्याने मांसाहारावर बंदी आणावी अशी मागणी जैन समूदायाकडून करण्यात येत होती.

जैन समाजाच्या धार्मिक भावनांचा आदर करत राज्य सरकारने पालितानामध्ये मांस, अंडी विक्री तसेच पशुहत्येवर पूर्ण बंदी लागू केली आहे. या नियमाचे उल्लंघन केल्यास दंडाची तरतूद करण्यात आली आहे. हा निर्णय जैन समाजासाठी मोठा विजय मानला जात असून शाकाहारी जीवनशैलीला मिळालेला मोठा पाठिंबा म्हणून पाहिले जात आहे. बंदीनंतर शहरात अनेक नवीन शाकाहारी रेस्टॉरंट्स सुरू झाले आहेत. पालितानामध्ये मांसाहारावर बंदी घालण्याच्या प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात काही गटांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते हा निर्णय खाद्यस्वातंत्र्यावर गदा आणतो आणि पर्यटनावरही परिणाम करू शकतो. कारण अनेक पर्यटकांना मांसाहारी भोजन आवडते. राजकीय पातळीवर पाहता भावनगरमध्ये भाजपचा प्रभाव मोठा असून पालिताना मतदारसंघातून भाजपने अनेक वेळा विजय मिळवला आहे.

## श्रीमंती लाल किल्ल्याची



जुन्या दिल्लीचा ऐतिहासिक लाल किल्ला सध्या जगभरात चर्चेत आहे. गुगलवर 'लाल किल्ला' सर्च केल्यावर स्फोटाचे फोटो आणि बातम्या समोर येत आहेत. याच लाल किल्ल्यावरून पंडित जवाहरलाल नेहरूंनी पहिल्यांदा भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा केली होती. मुगल सम्राट शाहजहानला आग्र्याऐवजी दिल्लीला आपली राजधानी बनवायची होती. त्याला राजधानीसाठी एका खास राजवाड्याची आवश्यकता होती, म्हणून त्याने १६३८ मध्ये लाल किल्ल्याचे बांधकाम सुरू केले. हा किल्ला इतका मोठा आहे, की तो पूर्ण होण्यासाठी दहा वर्षे लागली. २५० एकरांवर पसरलेला हा किल्ला मुगलांच्या भव्य वास्तुकलेचे प्रतीक आहे. यमुना नदीच्या काठावर बांधलेला हा किल्ला ३३ मीटर उंच भिंतीने वेढलेला आहे. लाल किल्ल्याला सहा मुख्य दरवाजे असले, तरी त्याचे प्रवेशद्वार लाहोर दरवाज्यातून आहे.

लाल किल्ल्याच्या बांधकामानंतर, मुगल सम्राट शाहजहानने १६४७ मध्ये त्याच्या उद्घाटनासाठी विशेष सजावट करण्याचे आदेश दिले होते. राजवाड्याच्या मुख्य खोल्या जड पडद्यांनी सजवल्या गेल्या होत्या आणि चीनी रेशीम आणि तुर्की मखमलीने सजवल्या गेल्या होत्या. लाल किल्ल्याच्या आत 'दिवाण-ए-आम', 'दिवाण-ए-खास', मोती मस्जिद, हिरा महल, रंग महल, खास महल आणि हयात बख्श बाग यासह डझनभर लहान राजवाडे आणि इमारती आहेत.

लाल किल्ला उस्ताद अहमद आणि उस्ताद हमीद यांनी बांधला होता. लाल किल्ल्याच्या आत राजवाड्यांच्या रांगा आहेत. संगमरवरी पोशाख असलेला मुमताज महाल मुघल सम्राटाचा आवडता होता. त्यात सहा खोल्या आणि एक तळघर आहे. संगमरवरी खुर्च्या आहेत. शीश महालमध्ये राजवाडादेखील आहे. तो लहान आरशांनी जडलेला आहे. राजवाड्यात २०० हून अधिक खोल्या आहेत, ज्यात दिवाण-ए-खास (५० खोल्या), दिवाण-ए-आम (२० खोल्या) आणि शाही निवासस्थान आहे. त्यात अंदाजे ८० खोल्या आहेत. १६३८-४८ या काळात लाल किल्ल्याच्या बांधकामासाठीएक कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च आला. आजच्या काळानुसार विचार केल्यास ते अब्जावधी रुपये होतील.

आज लाल दिसणारा लाल किल्ला मूळतः लाल नव्हता. मूळतः तो पांढरा होता, परंतु १९ व्या शतकात नूतनीकरणादरम्यान, ब्रिटिशांनी त्याचा रंग पांढऱ्यावरून लाल केला. रंगासोबतच त्याचे नावही बदलले. लाल किल्ल्याचे जुने नाव 'किला-ए-मुबारक' होते, नंतर ते लाल किल्ला म्हणून प्रसिद्ध झाले. शाहजहानने लाल किल्ल्यामध्ये एक खास सिंहासन बनवले होते, ज्याला 'मयूर सिंहासन' असे नाव देण्यात आले.

## महागडी भाजी



भाजीच्या किंमती वाढल्यावर सर्वसामान्य आरडाओरड करू लागतात. भाजीसाठी १००, २०० रुपये देणंही आपल्याला नको वाटतं. तिथे काही हजार रुपये खर्च करणं तर दूरच राहिलं. पण भारतात मिळणाऱ्या एका भाजीची किंमत काही हजार रुपये आहे. ही भाजी खरेदी करण्याचा विचारही आपण करू शकत नाही. गुच्छी असं या भाजीचं नाव असून हा मशरुमचा एक प्रकार आहे. गुच्छी मशरुम हिमालयात उगवतं.हे मशरुम २५ ते ३० हजार रुपये किलोने विकलं जातं. फक्त भारतातच नाही तर परदेशातही हे मशरुम खूप प्रसिद्ध आहे. गुच्छी खूप गुणकारी आहे. यात बरेच औषधी गुणधर्म आहेत. शिवाय मशरुमचा हा प्रकार खूप दुर्मिळ असल्यामुळे त्याची भरपूर किंमत मोजावी लागते. गुच्छी हृदयविकारावरही प्रभावी असल्याचं म्हटलं जातं. गुच्छी खाल्यानंतर तुम्हाला जीवनसत्त्व बाहेरून घेण्याची गरज पडणार नाही. फेब्रुवारी ते एप्रिल या काळात गुच्छी मिळते. मोठ्या हॉटेल्समध्ये याला बरीच मागणी असते. गुच्छी आणण्यासाठी डोंगरावर बरंच उंचावर जावं लागतं. गुच्छी वाळवून मग परदेशात निर्यात केली जाते. तर ही भाजी अनोखीच आहे.

## बोगद्यातून सुरू होती तस्करी

गुन्हेगार गुन्हा करण्यासाठी कोणतीही शक्कल लढवू शकतात. तसं पहायला गेलं तर ते पोलिसांपेक्षाही एक पाऊल पुढे असतात. पण पोलीसही शेरास सव्वाशेर बनून या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळतात. मध्यंतरी अमेरिकेत असंच काहीतरी घडलं. बोगद्यातून अंमली पदार्थांची ने-आपण करणाऱ्या तस्कराचा पर्दाफाश केला. एका बंद पडलेल्या रेस्तराँमध्ये अंमली पदार्थ विक्रीचं काम सुरू करण्याचं त्याने ठरवलं होतं. या कामासाठी रेस्तराँच्या खाली त्याने एक बोगदा तयार केला. हे रेस्तराँ ॲरिजोना आणि मेक्सिको यांच्या सीमेवर आहे. अशाप्रकारे अंमली पदार्थांची तस्करी करणं ही या भागातली अगदी सर्वसामान्य बाब आहे. अशी



बरीच प्रकरणं समोर येत असल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. पण या प्रकरणात आरोपीने भूमीगत बोगदा तयार करून तस्करी सुरू केली. या प्रकाराची खबर मिळाल्यानंतर पोलीस या रेस्तराँमध्ये पोहोचले. त्यावेळी या बोगद्याचा शोध लागला.

## खचताहेत अनेक महानगरे!



मायानगरी मुंबईसह दिल्ली, कोलकाता, चेन्नई अशा देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये जमीन खचत असून, दरवर्षी काही मिलीमीटरने भूखंड खचत असल्याचं एका अहवालात नुकतंच प्रसिद्ध करण्यात आलं आहे. 'नेचर सस्टेनेबिलिटी' या आंतरराष्ट्रीय विज्ञान नियतकालिकात त्याबाबतची निरीक्षणपर माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई, दिल्लीसह पाच शहरांतील सुमारे ८७८ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाची जमीन सतत खचत आहे.

**जमीन खचण्याची कारणे**

* भूजलाचा अमार्यद उपसा मुख्य कारण
* पाणी उपशामुळे मातीत कोरडेपणा येऊन ती आकुंचन पावते
* भूजलाची जागा माती घेतात आणि जमीन खचत राहते
* वाढता शहरी ताण, जलव्यवस्थापनाचा अभाव
* वाढत्या क्रॉक्रिटीकरणामुळे पाणी मुरण्यात अडचण
* अनियमित पावसाच्या चक्राचाही मोठा फटका
* भूजल साठ्यात मोठी घट

२०१५ ते २०२३ दरम्यान युरोपियन उपग्रह 'सेंटिनेल-१' कडून मिळालेल्या रडार आकडेवारीवरून हा निष्कर्ष काढण्यात आला. सदर निरीक्षणपर अध्ययनानुसार मुंबई, दिल्ली, चेन्नईतील अनेक भाग इतक्या वेगाने खचत आहेत. त्यामुळे इमारती, रस्ते आणि जलवाहिन्यांनाही गंभीर धोका निर्माण होत आहे. भूजलाचा अतिरिक्त उपसा हे प्राथमिक स्तरावर जमीन खचण्याचं मुख्य कारण सांगण्यात येत आहे.

**कुठे किती वेगाने खचतेय जमीन?**

* दिल्ली- ५१ मिलीमीटर
* चेन्नई- ३१.७ मिलीमीटर
* मुंबई २६ मिलीमीटर
* कोलकाता- १६ मिलीमीटर
* बेंगळुरू- ६.७ मिलीमीटर


## इथे आहे जिवंत ज्वालामुखी

भारतात भव्य पर्वतांपासून शांत समुद्रकिनाऱ्यांपर्यंत सर्व काही मिळेल. पण अंदमान समुद्रातील एक ठिकाण खूपच वेगळे आहे. दक्षिण आशियातील एकमेव सक्रीय ज्वालामुखी तिथे आहे. अंदमान आणि निकोबार बेटांचा भाग असलेल्या बॅरेन या बेटावर तो ज्वालामुखी आहे.

बॅरेन बेट अंदमान आणि निकोबार बेटांची राजधानी पोर्ट ब्लेअरपासून सुमारे १४० किलोमीटर अंतरावर आहे. हे बेट भारतीय आणि बर्मी टेक्टोनिक प्लेट्सच्या सीमेवर आहे. सुमारे तीन चौरस किलोमीटर पसरलेले बॅरेन बेट बहुतेक ज्वालामुखीच्या शंकू आणि राखेने झाकलेले आहे.

१७८७ मध्ये या ज्वालामुखीचा प्रथम उद्रेक झाला, तेव्हापासून ज्वालामुखीने अधूनमधून काही लहान मोठे उद्रेक अनुभवले आहेत. १९९१, २००५, २०१७ आणि २०२२ मध्ये किरकोळ उद्रेकांची नोंद झाली.

अवघड परिस्थिती असूनही, येथे जीवन टिकून आहे. ज्वालामुखीच्या उतारावर शेळ्या, उंदीर आणि कबुतरांच्या काही प्रजाती आढळल्या आहेत. असे म्हटले जाते, की बंगालच्या



उपसागरात जहाजाच्या ढिगाऱ्यातून शेळ्या आल्या आणि बेटावरील गोड्या पाण्याच्या झऱ्यांमुळे ते टिकून राहतात. भारतीय वैज्ञानिक आणि भूगर्भशास्त्रज्ञ येथे ज्वालामुखी क्रिया, पृथ्वीतील उष्णता प्रवाह, आणि भूकंपजन्य हालचाली यांचा अभ्यास करतात. राष्ट्रीय भूभौतिकीय संशोधन संस्था (एनजीआरआय) आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) यांनी उपग्रहाद्वारे घेतलेल्या छायाचित्रांद्वारे या ज्वालामुखीचे निरीक्षण केले आहे. बॅरन आयलंडवर कोणतीही स्थायी मानवी वस्ती नाही. केवळ वैज्ञानिक मोहिमा आणि नौदल गस्त यापुरतीच मानवी हालचाल येथे दिसून येते..

बॅरन आयलंडचा लाव्हा समुद्रात मिसळून नवीन जमीन तयार करतो. उद्रेकादरम्यान ज्वालामुखीचा राखेचा धूर दोन किलोमीटर उंचीपर्यंत पोहोचतो. ज्वालामुखी शांत झाल्यानंतरही उष्ण वायू आणि गंधकाचा धूर काही दिवस बाहेर पडत राहतो. बॅरेन बेट सक्रीय असले तरी, भारतात इतर कोणताही सक्रीय ज्वालामुखी नाही. काही ठिकाणी सुप्त किंवा नामशेष ज्वालामुखी आहेत, परंतु त्यापैकी कुठेही बॅरेन बेटासारखी हालचाल दिसत करत नाही. हे बेट पूर्णपणे निर्जन आहे, तरीही अंदमान आणि निकोबार प्रशासन त्यावर बारीक लक्ष ठेवते. हे ठिकाण केवळ एक पर्यटन स्थळ नाही, तर वैज्ञानिक संशोधनासाठी एक महत्त्वाचे ठिकाणदेखील आहे. टेक्टोनिक प्लेट सीमेवर असलेले हे बेट ज्वालामुखीची निर्मिती, टेक्टोनिक प्रक्रिया आणि बेट उत्क्रांतीबद्दल मौल्यवान माहितीचा खजिना देते.

## असा हा जपान

जपानला उगवत्या सूर्याचा देश असं म्हटलं जातं. जपानने गेल्या काही वर्षांत खूप प्रगती केली आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात हा देश आघाडीवर आहे. असं असलं तरी जपानाची एक संस्कृती आहे. परंपरा आणि पद्धती आहेत. या देशातले लोक परंपरांचं पालन करतात. इथली संस्कृतीही अनोखी आहे. आपण भारतीय हात जोडून अभिवादन करतो तर जपानी लोक अभिवादन करण्यासाठी खाली वाकतात. सन्माननीय व्यक्तीसमोर शक्य तितकं जास्त झुकून आदर व्यक्त केला जातो. दोन्ही व्यक्ती एकमेकांसमोर झुकतात. जपानी लोकांना स्वच्छता खूप प्रिय आहे. हे लोक दीर्घायुषी असतात. जपानी लोकांचं सरासरी ८२ वर्षं जगतात. जगातल्याा कोणत्याही देशाच्या तुलनेत हे आर्युमान अधिक आहे. वक्तशीरपणा ही सुद्धा जपानी लोकांची खासियत आहे. जपानमधल्या रेल्वेगाड्याशी वेळेत धावतात. या गाड्या ३० सेकंदांपेक्षा जास्त उशीरा धावत नाहीत. जपानमधल्या सार्वजनिक ठिकाणी जोरात बोलणं आणि हुंगणं असभ्यपणाचं लक्षण मानलं जातं. यासोबतच हातात हात घालून चालणंही योग्य मानलं जात नाही.



जपानी लोक नववर्षाच्या प्रारंभी मंदिरात जावून १०८ घंटा वाजतात. जपानमधल्या हिरोशिमा आणि नागासाकी या दोन बेटांवर अणूबॉम्ब टाकण्यात आला होता. मात्र या विध्वंसामुळे जपान खचला नाही तर त्याने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेतली. आज जपानची गणना जगातल्या विकसित देशांमध्ये केली जाते.

# कोणी धमक्या देत असेल तर चिंता करू नका

## तारीख आणि वेळ सांगावी, आम्ही तेथे पोहचून जाऊ : सुनील केदार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागपूर जिल्ह्यात नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. भाजप आणि काँग्रेसमध्ये जिल्ह्यात अटीतटीची लढत आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडणे सुरू आहे, परस्परांना धमक्या दिल्या जात आहे, त्यावर तीव्र प्रतिक्रियाही उमटत आहे. भाजपचे सावनेरचे आमदार आशीष देशमुख यांचा अलीकडच्या काळात धमकीच्या संदर्भातील व्हीडीयो प्रचंड व्हायरल झाला आहे, याला प्रतिउत्तर काँग्रेस नेते सुनील केदार यांनी दिले असून तो व्हीडीयो सुद्धा राजकीय क्षेत्रात चर्चेचा विषय ठरला आहे.

काहीच दिवसापूर्वी भाजपचे आमदार आशीष देशमुख यांचा कळमेश्वरमधील जाहीर सभेतील व्हीडीओ प्रसारित झाला होता. यात ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख करीत विरोधकांना धमकावताना दिसतात ते म्हणतात. फडणवीस मुख्यमंत्री आहेत, ते नागपूरचे आहेत,त्यांच्याकडे गृहखाते आहे, त्यामुळे कोणी धमकावण्याचा प्रयत्न केला तर आडवे कापू यावर काँग्रेससह इतरही विरोधी पक्षाने सडकून टीका केली होती.

सावनेर विधानसभा मतदार संघात आशीष देशमुख आणि काँग्रेस नेते सुनील केदार यांच्या राजकीय शत्रुत्व सर्वश्रुत आहे.

त्यामुळे देशमुख यांच्या धमकीला केदार प्रतिउत्तर देणार हे ठरलेले होते. केदार यांनी सावनेरमध्ये घेतलेल्या प्रचारसभेत हिशेब चुकता केला. ते म्हणाले कोणी धमक्या देत असेल चिंता करू नका, आणि धमक्या देणाऱ्यांना खुपच आग असेल तर त्यांनी जागा,तारीख आणि वेळ सांगावी,आम्ही तेथे पोहचून जाऊ सध्या केदार यांचा हा व्हीडीओ चांगलाच व्हायरल होत आहे.

### पक्ष्यांच्या निवडणुकीत तांबटला सर्वाधिक मते

# अमरावतीचा शहर पक्षी जाहीर



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ३० :

पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी महापालिकेने अमरावती शहराचा पक्षी निवडण्याची प्रक्रिया गेल्या १८ नोव्हेंबरपासून सुरू केली होती. आज या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला. तांबट या पक्ष्याला सर्वाधिक मते मिळाली आणि या पक्ष्याची निवड अमरावतीचा शहर पक्षी (सिटी बर्ड) म्हणून करण्यात आली. शहर पक्ष्याची निवड करणारे अमरावती हे महाराष्ट्रातील पहिले शहर ठरले आहे. हॅपी स्ट्रीट कार्यक्रमात महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी ही घोषणा केली.

माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत महापालिका आणि वाईल्डलाईफ कन्झर्वेशन सोसायटी (डब्ल्यूईसीएस) यांच्या संयुक्त सहकार्यातुन ही निवडणूक घेण्यात आली. अमरावती शहराच्या ओळखीशी सुसंगत आणि येथील पर्यावरणात सहज आढळणाऱ्या सहा पक्ष्यांची नावे उमेदवारीसाठी जाहीर करण्यात आली होती. त्यात भारतीय राखी धनेश (इंडियन ग्रे हॉर्नबिल), तांबट (कॉपरस्मिथ बार्बेट), भारतीय हूदहूद (इंडियन हुपो), पिंगळा (इंडियन आऊलेट), शिक्रा आणि भारद्वाज (ग्रेटर कूकल) या पक्ष्यांचा समावेश होता.

निवड प्रक्रियेत नागरिकांचा व्यापक सहभाग होता. अमरावती महापालिका आणि वन्यजीव पर्यावरण व संरक्षण संस्था यांच्या संयुक्त उपक्रमातून १८ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर दरम्यान विशेष ऑनलाइन पोर्टलद्वारे मतदान घेण्यात आले. या मतदानात ५,४४५ मते नोंदवली गेली. तांबट पक्ष्याला सर्वाधिक १,४१४ मते मिळाली, त्यानंतर भारद्वाज (१,०३२ मते), भारतीय राखी धनेश (९९८ मते), भारतीय हुदहुद (७९६ मते), पिंगळा (६५५ मते), आणि शिकरा (५५१ मते) यांचा क्रमांक लागतो.

जैवविविधतेचे संरक्षण, पक्षी व पर्यावरणाबाबत जागरूकता वाढवणे, आणि अमरावतीला एक अनोखी पर्यावरणपूरक ओळख देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. निसर्ग अभ्यासक आणि लेखक प्र.सु. हिरूरकर यांनी या निवडीचे स्वागत केले आहे. अलीकडेच त्यांनी तांबट पक्ष्याचे छायाचित्र काढले आहे.

निसर्गाने रंगाची मुक्त उधळण केलेला तांबट पक्षी एखाद्या वाळलेल्या फांदीवर आपल्या टणक चोचीने घरट्यासाठी छिद्र पाडण्यात गुंग झालेला दिसत असेल तर किती आनंद होत असेल, हे शब्दात सांगणे कठीणच. त्यातल्या त्यात एकाच वेळेस तांबटाची मादी घरट्यात आणि नर बाहेरून निगराणी करतानाचा क्षण जर कॅमेरात टिपता आला तर माज्या सारख्या निसर्गाच्या इवल्याशा विद्यार्थ्यांला निसर्ग नावाच्या महागुरूंनी विशेष आशीर्वाद दिल्या सारखे वाटते. चार दशकांपासून सुरू झालेल्या पक्षी निरीक्षणाच्या आणि अभ्यासाच्या या शाळेचा शेवटच्या श्वासापर्यंत विद्यार्थीच राहण्याची माझी इच्छा आहे, अशा भावना प्र.सु. हिरूरकर यांनी व्यक्त केल्या आहेत.

### श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या छायाचित्रासह

# टपाल तिकीट जारी होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या प्रमुख उपस्थितीत एक कार्यक्रम होणार आहे. राज्य प्रदर्शनी समितीच्या बैठकीत श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या छायाचित्रासह भारतीय डाक विभागामार्फत स्मृतिचिन्ह म्हणून टपाल तिकीट जारी करण्याचा निर्णय घेतला. ७ डिसेंबर रोजी नागपूर येथील सुरेश चंद्र सुरी ग्राउंड, जरीपटका पोलीस स्टेशन रोड, नारा येथे सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय प्रदर्शनी समितीची बैठक मुंबईत नुकतीच झाली. यावेळी नियोजनाबाबत चर्चा आणि प्रदर्शनाचे सादरीकरण करण्यात आले.

बैठकीस कोकण भवनचे अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य रविंद्र पवार, राज्य पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष तथा समितीचे निमंत्रक व कार्याध्यक्ष बल मलकित सिंह, समन्वयक तथा कार्यकारी अधिकारी डॉ. जगदिश साकवान, समितीचे सदस्य लढाराम नागवाणी, डॉ.कुलतारसिंह चीमा, जयराम पवार, श्रीनिवास पुलैया, रवींद्र राठोड, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या अवर सचिव विशाखा आढाव यांच्यासह राज्यस्तरीय समन्वय समितीचे सदस्य यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणारे ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शनी आयोजित करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात संतांचा इतिहास, कार्य, राष्ट्रसेवा यासंदर्भात माहिती देणारी प्रदर्शनेही उभारण्यात येतील. शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, वाल्मिकी आणि सिंधी समाज एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम करणार आहेत.

संतांच्या साहित्य आणि पुस्तकांचे विशेष प्रदर्शनही याप्रसंगी आयोजित करण्यात येणार आहे. या शताब्दी समागमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा धर्मरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### भरधाव ट्रॅव्हल्सच्या अपघातात एक जागीच ठार

# २० हून अधिक जखमी

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. ३० :

महासागर प्रतिनिधी
आर्णीकडून यवतमाळकडे येणाऱ्या एका भरधाव ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात झाला. छत्तीसगडमधील एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर २० हून अधिक प्रवासी जखमी झाले.
आज रविवार, ३० नोव्हेंबर रोजी, पहाटे ३ वाजता, यवतमाळ शहरालगतच्या वाघाडीजवळ हा अपघात झाला. मृत प्रवाशाचे नाव मणिराम पानपुरम कोरम वय (४०) असे आहे, तो छत्तीसगडचा रहिवासी होता.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, CG०८AW००९९ क्रमांकाचे ट्रॅव्हल्स वाहन रविवारी पहाटे सोलापूरहून छत्तीसगडमार्गे यवतमाळला प्रवाशांना घेऊन येत होते. यवतमाळ ग्रामीण पोलिस स्टेशन अंतर्गतच्या वाघाडीजवळ, चालकाचे नियंत्रण सुटले आणि ट्रॅव्हल्स वाहन उलटले, रस्त्याच्या कडेला असलेले बॅरिकेड तोडून शंभर फूट ओढले नेले.

या भीषण अपघातात छत्तीसगडचे रहिवासी मणिकर्मा कोरम यांचा जागीच मृत्यू झाला, तर २० हून अधिक प्रवासी जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच, यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्याचे पी.आय. सुनील नाईक आणि एपीआय प्रवीण मानकर हे पथकासह घटनास्थळी पोहोचले आणि स्थानिक रहिवाशांच्या मदतीने जखमींना जिल्हा सरकारी रुग्णालयात हलवले. जखमींमध्ये भंडारा जिल्ह्यातील मालेगाव येथील रहिवासी केतकी कुळसंगे (२६), शालिनी गायधने (२६, रा. कामोर), सुमित खोब्रागडे (५०, रा. गोंदिया), उर्मिला मिसाळ (१४, रा. छत्तीसगड), आकाश अग्रवाल (२०, रा. रा. रावपूर), आकाश अग्रवाल (वय ३०) यांचा समावेश आहे. नारायण विश्वकर्मा (२९), रोहन महंत (९), मोनिका विश्वकर्मा (१९), नरसिंग फुलवारिया (२४, रा. शिंदोडी), श्रीकांत मिश्रा (२५, रा. प्रयागराज), जुनैद बीन (२७), तुषार गजभरे (२७), शिवहारी (२६), शिवराय (२६) रा. नामेश्वर निषाद (३५), व इतर. एका प्रवाशाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला नागपूरला रेफर करण्यात आले.
अपघातानंतर, ट्रॅव्हल्सचा दुसरा चालक जुनैद बिन जाबेर मोहम्मद जाबेर (२७), रहिवासी छत्तीसगड, याने यवतमाळ ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी ट्रॅव्हल चालक बबलू अशोक यादव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस विभागाने चालकाची प्रकृती गंभीर असल्याचे नोंदवले आहे आणि त्याला नागपूर येथे रेफर करण्यात आले आहे. यवतमाळ ग्रामीण पोलिस तपास करत आहेत.

# वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार



■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ३० :

मानव वन्यजीव संघर्ष टोकाला पोहोचलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात शनिवार, २९ नोव्हेंबरला संध्याकाळी चिचापल्ली क्षेत्रात जनावरे चारण्यासाठी गेलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला केला. यात गुराख्याचा मृत्यू झाला. रमेश नागो बोमनवार (५५), असे मृत गुराख्याचे नाव आहे. या वर्षातील वन्यप्राण्यांच्या हल्ल्याची ही ४१ वी घटना आहे.

चंद्रपूर वनपरिक्षेत्रातील चिचपल्ली रेंज कंपार्टमेंट क्रमांक ६९६ मध्ये मंदा तुकूम गावातील रहिवासी रमेश नागो बोमनवार हे नेहमीप्रमाणे गुरे चारण्यासाठी जंगलात गेले होते. मात्र त्याठिकाणी दबा धरून बसलेल्या वाघाने बोमनवार यांच्यावर हल्ला करीत ठार केले. या घटनेची माहिती वनविभागाला मिळाल्यावर त्यांनी तात्काळ घटनस्थळ गाठत पंचनामा केला. नियमानुसार मृत गुराख्याच्या कुटुंबाला वनविभागातर्फे आर्थिक मदत देण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

विभागीय वनाधिकारी राजन तलमले यांनी परिसरातील नागरिकांना आवाहन केले आहे की, वन्यप्राण्यांच्या हालचाली लक्षात घेऊन अशा संवेदनशील वनक्षेत्रात एकटे फिरणे टाळावे आणि सतर्कता बाळगावी. वन्यप्राण्यांबद्दल कोणतीही माहिती असल्यास त्वरित वन विभागाला कळवावी.दरम्यान यावर्षी आतापर्यंत ४१ जणांचा मानव वन्यजीव संघर्ष यामध्ये बळी गेला आहे. वाघाच्या हल्ल्यात ३७, बिबटच्या हल्ल्यात २, हत्ती व अस्वलाच्या हल्ल्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे.

# घुग्घुस पालिका निवडणुक स्थगित

■ महासागर प्रतिनिधी,चंद्रपूर, दि. ३० :

प्रचाराच्या ऐन रणधुमाळीत आणि दोन दिवसांवर मतदान आले असतांना राज्य निवडणुक आयोगाने न्यायालयाच्या एका निर्णयानंतर घुग्घुस नगर पालिका निवडणुक प्रक्रियेला स्थगिती दिली आहे. आता ही निवडणुक २० डिसेंबर रोजी होणार आहे. दरम्यान नगराध्यक्ष पदासोबतच नगरसेवकांनी प्रचारात लाखोंची उधळण केल्यानंतर निवडणुक स्थगित झाल्याने संताप व्यक्त होत आहे. या सर्व घडामोडीमुळे उमेदवारांना मोठा मनस्ताप व आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

घुग्घुस नगर पालिका निवडणुकीत उध्दव ठाकरे शिवसेनेच्या शोभा ठाकरे यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र छननी प्रक्रियेत ठाकरे यांची उमेदवारी रद्द करण्यात आली होती. याविरूध्द ठाकरे यांनी जिल्हा न्यायालयात अपील केले. न्यायालयाचा निकाल ठाकरे यांच्या बाजूने लागला. न्यायालयाच्या या निर्णयानंतर राज्य निवडणुक आयोगाने घुग्घुस नगर पालिका निवडणुकीच्या प्रक्रियेला स्थगिती दिली.


## भारत-श्रीलंका व्यवसाय आणि व्यापार संबंध होणार मजबूत



लोकार्थ

भारत-श्रीलंका संबंध आपल्याला येत्या काही वर्षांत व्यापार आणि गुंतवणूक दुप्पट करण्यास सक्षम करतील, ज्यामध्ये भारतीय आणि श्रीलंकेच्या व्यवसाय आणि गुंतवणूक समुदायांमधील धोरणात्मक आणि द्विपक्षीय सहभाग असेल, असे मत मुंबईतील श्रीलंकेच्या वाणिज्य दूत जनरल सुश्री किशानी प्रियांगा विक्रमसिंघे यांनी व्यक्त केले. जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यूटीसी), मुंबई आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (एआयएआय) यांनी आयोजित केलेल्या उच्चस्तरीय विशेष गोलमेज परिषदेत त्या बोलत होत्या.

श्रीलंकेच्या वाणिज्य दूत सुश्री विक्रमसिंघे यांनी श्रीलंकेतील गुंतवणूकीचे वातावरण मजबूत करणे आणि पायाभूत सुविधा, पर्यटन आणि सेवा यासारख्याभारतीय कंपन्यांचा वाढता सहभाग यावर अधिक प्रकाश टाकला.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार गेल्या काही वर्षांत ५ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त झाला आहे, भारत हा श्रीलंकेचा एक प्रमुख व्यापारी भागीदार राहिला आहे आणि श्रीलंका हा भारतीय बाजारपेठेत दक्षिण आशियाई निर्यातदार म्हणून कायम आहे. वस्तूंव्यतिरिक्त, सेवा उद्योगात, विशेषतः पर्यटन, शिक्षण, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स आणि व्यावसायिक सेवांमध्ये, प्रचंड क्षमता आहे, जी सखोल सहकार्य आणि परस्पर फायदेशीर वाढीसाठी प्रचंड क्षमता आणि संधी प्रदान करते.

■ ■ ■

### शियाना हाऊसिंगचा रेसिडेनशीएल प्रोजेक्ट

## आशियाना आरोहम लाँच




हा प्रकल्प हिरव्या जागा, व्यावहारिक डिझाइन आणि आधुनिक सुविधांवर भर देणारे क्युरेटेड, किड-केंद्रित राहणीमान वातावरण सादर करतो. पहिल्या टप्प्यात १८२ युनिट्स बाजारात येतात, ज्याची किंमत २.९९ कोटी ते ४.१९ कोटी दरम्यान आहे.

आशियाना आरोहमची संकल्पना कमी घनतेचा समुदाय म्हणून करण्यात आली आहे ज्यामध्ये सहा टॉवर्समध्ये एकूण ५४२ युनिट्स आहेत, ज्यामध्ये डुप्लेक्स पर्याय आणि प्रीमियम २ ते ५ बीएचके लेआउट समाविष्ट आहेत.

एनएसई आणि बीएसई वर सूचीबद्ध असलेल्या आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर आशियाना हाऊसिंग लिमिटेडने गुरुग्रामच्या सेक्टर ८० मध्ये त्यांचा नवीन निवासी प्रकल्प आशियाना आरोहम लाँच करण्याची घोषणा केली.

हा प्रकल्प एकूण नियोजित गुंतवणुकीसह ७५० कोटींपेक्षा जास्त विकसित केला जात आहे, पहिला टप्पा अंदाजे २५० कोटींचा आहे. प्रकल्पाची जमीन पूर्णपणे आशियाना हाऊसिंगच्या मालकीची आहे. १०.८ एकरमध्ये पसरलेला, टॉवर्स कॅम्पसमधून स्पष्ट, खुले दृश्यांसह, जास्तीत जास्त वायुवीजन आणि नैसर्गिक प्रकाश मिळविण्यासाठी स्थित आहेत. प्रत्येक अपार्टमेंटमध्ये संलग्न बाल्कनी, मॉड्यूलर किचन, उपयुक्तता क्षेत्रे आणि HEPA फिल्टर केलेले ताजे हवा प्रणाली समाविष्ट आहे. प्रकल्पातील ९ एकरपेक्षा जास्त जमीन हिरव्या आणि खुल्या क्षेत्रांसाठी समर्पित आहेत.

■ ■ ■

### हरित इमारत काँग्रेस २०२५ मध्ये महत्त्वाचा सामंजस्य करार



भारतीय उद्योग महासंघाच्या भारतीय हरित इमारत परिषद आणि ग्लोबल रिअल इस्टेट सस्टेनेबिलिटी बेंचमार्क यांनी IGBC च्या हरित इमारत काँग्रेस २०२५ च्या २३ व्या आवृत्तीत एक महत्त्वाचा सामंजस्य करार केला, जो आशियातील सर्वात मोठा परिषद आणि प्रदर्शन आहे जो हिरव्या इमारती आणि शाश्वत बांधलेल्या वातावरणाला समर्पित आहे.

या धोरणात्मक सहकार्याचे उद्दिष्ट विद्यमान हरित वित्त तफावत भरून काढत निव्वळ शून्य रिअल इस्टेटकडे भारताच्या संक्रमणाला गती देणे आहे. हा सामंजस्य करार शाश्वत वित्त यंत्रणांना पुढे नेण्यासाठी सहकार्याला औपचारिकता देतो ज्यामुळे रिअल इस्टेट विकासक आणि वित्तीय संस्थांना हिरव्या कर्जे, क्रेडिट लाइन्स आणि एरत्रक्ष-सरिखित वित्तीय साधनांमध्ये वाढीव प्रवेशाद्वारे संपूर्ण भारतात हरित इमारत प्रकल्पांचे प्रमाण वाढविण्यास सक्षम केले जाईल.

मुंबईत GRESB च्या मुख्य उत्पादन अधिकारी सुश्री रोक्साना व्हॅन डेन बर्ग आणि CII-ग्रीन बिझनेस सेंटरचे कार्यकारी संचालक के.एस. वेंकटगिरी यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही नेत्यांनी हरित गुंतवणूकीला चालना देण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणात निव्वळ शून्य इमारतींना समर्थन देणारे प्रणालीगत फ्रेमवर्क तयार करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीचे महत्त्व अधोरेखित केले.

■ ■ ■

### भारती एअरटेलचे उपाध्यक्ष गोपाळ विठ्ठल यांचे ग्राहकांना पत्र

भारतात मोठ्या प्रमाणात डिजिटल फसवणूकीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. वाढत्या सायबर गुन्ह्यांचे केसेस पाहता भारती एअरटेलचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गोपाळ विठ्ठल यांनी या सततच्या वाढत्या गुन्ह्यांबद्दल चिंता व्यक्त केली. या घटना आटोक्यात येण्यासाठी एअरटेलकडून राबवल्या जाणा-या आवश्यक उपाययोजनांबद्दल माहिती देण्यासाठी ग्राहकांना उद्देशून त्यांनी पत्र लिहिले आहे. आजकाल बनावट पार्सल डिलीव्हरीचे कॉल, फिशिंग लिंक्स आणि डिजिटल अरेस्ट आदी घोटाळे मोठ्या प्रमाणात घडत असताना एअरटेल आपल्या ग्राहकांच्या सुरक्षेसाठी पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर त्यांनी एअरटेल पेमेंट्स बँकेच्या सेफ सेकं अकाउंटची घोषणा केली. हे खाते ग्राहकांच्या मुख्य बँक खात्यापासून स्वतंत्र ठेवले जाते. यामुळे डिजिटल पेमेंटसाठी वापरण्यात येणारा पैसा सुरक्षित राहतो आणि कोणत्याही संभाव्य फसवणूकीपासून अतिरिक्त संरक्षण मिळते.

एअरटेल नेटवर्कमध्ये होणारे गुन्हे किंवा फसवणूकीच्या घटना आमच्यासाठी मोठी चिंतेची बाब आहे. ग्राहकांची सुरक्षितता हेच आमचे कायमस्वरुपी प्राधान्य राहील. एअरटेल कंपनी अत्याधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ग्राहकांना स्पॅम कॉल आणि मेसेजबाबत कल्पना यावी याकरिता त्वरित अलर्ट देते. ग्राहकांनी चुकून एखादी लिंक क्लिक केली असेल तर ती लिंक ब्लॉक करण्याचीही सोय उपलब्ध करण्यात आल याचे गोपाळ विठ्ठल यांनी सांगितले. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


# मध्यवर्ती कारागृहात एकता खिचडीचा संपन्न

## कैद्यांच्या पुनर्वसनाला मिळाली सकारात्मक दिशा : शेफ विष्णू मनोहर




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

समाजातील प्रत्येक घटक मुख्य प्रवाहात यावा आणि त्यांच्या जीवनात नवी आशा व सकारात्मक दृष्टी निर्माण व्हावी, या उद्देशाने सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या पुढाकारातून ३० नोव्हेंबर रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृहात एकता खिचडी हा विशेष सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

३० नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजल्यापासून शेफ विष्णू मनोहर यांनी कारागृह परिसरात स्वतः एकता खिचडी तयार करण्यास सुरुवात केली. या वेळी कारागृहातील कैद्यांनी उत्साहाने व मनापासून खिचडी बनविण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेतला. सामूहिक कामाचा आनंद, शिस्त, स्वच्छता व सहकार्याचा अनुभव कैद्यांनी या उपक्रमातून घेतला.

ही खिचडी प्रेम, माणुसकी, समता व एकतेचे प्रतीक ठरली. तयार करण्यात आलेली खिचडी दुपारी ११ वाजल्यापासून कारागृहातील सर्व कैद्यांना वितरित करण्यात आली. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान स्वच्छता, आरोग्यदृष्ट्या काळजी, अन्न साठवण आणि अन्न हाताळणीचे सर्व निकष काटेकोरपणे पाळण्यात आले. कारागृहातील स्वयंपाकगृह व परिसरात उत्कृष्ट स्वच्छता व सुव्यवस्था राखण्यात आली होती. हा उपक्रम केवळ अन्नवाटपापुरता मर्यादित न राहता, कैद्यांच्या मानसिक व भावनिक परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरला. काम करताना कैद्यांचा उत्साह, सकारात्मकता आणि शिस्त स्पष्टपणे दिसून आली. अशा उपक्रमांमुळे कैद्यांना आपण बदलू शकतो, समाजासाठी उपयुक्त ठरू शकतोही भावना बळकट होत असून, त्यांच्या पुनर्वसन प्रक्रियेला निश्चितच मदत होत आहे.

हा अभिनव उपक्रम अप्पर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक (कारागृह व सुधार सेवा), (महाराष्ट्र राज्य) सुहास वारके तसेच कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. नागपूर मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक वैभव आगे आणि अतिरिक्त अधीक्षक दीपा आगे यांच्या संकल्पनेतून तसेच आनंद पानसरे (वरिष्ठ तुरुंग अधिकारी) यांच्या विशेष प्रयत्नांतून हा उपक्रम यशस्वी झाला. सर्व अधिकारी व कर्मचारी अत्यंत सहकार्यशील, उत्साही व सकारात्मक भूमिकेत या उपक्रमात सहभागी होते. यापूर्वीही शेफ विष्णू मनोहर व त्यांच्या टीमने नागपूर मध्यवर्ती कारागृहात कैद्यांसाठी फास्ट फूड प्रशिक्षणाचा उपक्रम राबविला होता.

### वाचनसंस्कृती संपली नाही : मुकुल कानिटकर

# नागपूर पुस्तक महोत्सवाचा समारोप



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

मागील दहा दिवस लाखो लोकांनी नागपूर पुस्तक महोत्सवाला भेट दिली. त्यात युवक मोठ्या संख्येने होते. त्यांनी हजारो पुस्तके खरेदी केली. हे पाहून वाचनसंस्कृती संपली असे म्हणणे चुकीचे आहे. स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांपेक्षा इतर साहित्याला प्रचंड मागणी दिसून आली. यावरून वाचनसंस्कृती संपली असे म्हणणे चुकीचे असून वाचनाची पद्धत बदलली आहे, हे ध्यानात घ्यावे लागेल, असे मत लेखक, विचारवंत व भारतीय शिक्षण मंडळाचे राष्ट्रीय संघटन सचिव मुकुल कानिटकर यांनी व्यक्त केले.

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) इंडियाच्या वतीने व महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रेशीमबाग मैदानावर सुरू असलेल्या नऊ दिवसीय नागपूर पुस्तक महोत्सव २०२५ व त्याअंतर्गत आयोजित झिरो माईल लिट फेस्टिवलचा शानदार समारोप झाला. समारोपीय सत्रात मुकुल कानिटकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी झिरो माईल फाउंडेशनचे संचालक डॉ. समय बनसोड यांची मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते यावेळी प्रा. मदन मोहन गोळे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. युवा पिढी, वाचनसंस्कृती आणि भारताच्या भविष्याबाबत बोलताना मुकुल कानिटकर म्हणाले युवक काही करत नाहीत, पुढची पिढी बिघडली असे दोषारोप करून आपणच समाज बिघडवत आहोत. माझा अनुभव असा आहे की पुढची पिढी ही मागील पिढीपेक्षा अधिक उन्नत असते. आजची पिढी ही फास्ट प्रोसेसरसारखी असून आम्हाला त्यांची भाषा शिकावी लागेल.

कानिटकर यांनी प्राचीन ज्ञान, विविधता आणि भारतीय अध्यात्मावर भाष्य केले. महोत्सवातील उपस्थित वाचकांना प्रेरणा देताना ते म्हणाले, या महोत्सवातून परतताना एक संकल्प करा. दररोज किमान एक पान तरी लिहा. फक्त वाचक न राहता लेखक बना, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला झिरो माईल लिट फेस्टिवल संचालक प्रशांत कुकडे, कल्याण देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# कुमारी मातेने नवजात बाळाला फेकले विहिरीत

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ३० :

गोंदिया तालुक्यातील एकोडी येथे आपले पाप लपवून अब्रु वाचविण्यासाठी नवजात बाळाला गावातील घरगुती विहिरीत फेकून हत्या केल्याचा प्रकार शनिवारी (२९ नोव्हेंबर) उघडकीस आला. या घटनेचे एकोडीसह परिसरात गावात एकच खळबळ उडाली. दरम्यान पोलिसांनी तपास हाती घेतल्यानंतर एका कुमारी मातेने हा प्रकार केल्याचे समोर आले. गंगाझरी पोलिसांनी या प्रकरणी कुमारी मातेला ताब्यात घेतले आहे.

सविस्तर असे की, एकोडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मागील भागात ढिवरटोली येथील रहिवासी राजेंद्र श्रीराम ठाकरे हे घरातील विहिरीत पाणी भरण्यासाठी गेले असता त्यांना एक नवजात बाळचे शव विहिरीत तरंगताना आढळले. या घटनेची माहिती शेजारील लोकांना देण्यात आली.

ही वार्ता गावात वाऱ्यासारखी पसरताच नागरीकांनी घटनास्थळ गाठून एकच गर्दी केली. तसेच घटनेला घेवून गावात चचार्ना उधाण आले. दरम्यान राजेंद्र ठाकरे यांनी तंमुस अध्यक्ष संतोष रिनायत यांच्यासोबत गंगाझरी पोलिस ठाण्यात तक्रार केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी घटनास्थळ गाठले व पंचनामा करण्यास सुरूवात केली.